गर्मी में भी सर्दी का मजा
COMPRO Systems & Services
Symphony
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
HDB FINANCIAL SERVICES | BAJAJ FINSERV
कुलर, ए.सी., फ्रीज
• वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

0% FINANCE AVAILABLE
G. P. ELECTRONICS
गुलमोहर रोड कॉर्नर, बडोदा बँकेजवळ, प्रोफेसर कॉलनी, सावेडी, अहमदनगर. मो. 8087626414 / 9665210100

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. ०८.०५.२०२४ | अंक नं. ०५६ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

लवकरच मिळणार !
परिवारातल्या प्रत्येकाला खुश करायची संधी
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

# छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसवा अन्यथा ११ मेपासून आमरण उपोषण करणार



## अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेचा महापालिका आयुक्तांना इशारा

नगर – धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या १४ मे जयंतीच्या दिवशी प्रोफेसर चौकात पुतळा बसवण्याच्या मागणीसाठी अनेक पत्रव्यवहार करून देखील अद्यापही कारवाई करण्यात आलेली नसल्याने छावा संघटनेच्या वतीने अहमदनगर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले आहे. १४ मे रोजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुतळा बसवण्यात यावा अन्यथा ११ मे पासून उपोषण सुरू करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी छावा संघटनेच्या महिला जिल्हा अध्यक्षा सुरेखाताई सांगळे, शिवप्रतिष्ठान जिल्हा अध्यक्ष बापू ठाणगे, दत्ता वामन, दीपक गहिले, किरण वाघ, भैय्या पठाण, केशव बरकते, अभय पतंगे, शंकर आटोळे, विलास कराळे, साहेबराव पाचारणे, सुनील ठाकरे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, छावा संघटनेच्या वतीने प्रधान सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना २ मे २०२२ रोजी व २३ जून २०२२ रोजी पालकमंत्री यांना १ मे २०२३ रोजी ना हरकत मिळण्याबाबत पत्रव्यवहार केला असून, त्यांचा पाठपुरावा आम्ही केला आहे. अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पण २ मे २०२२ व २३ जून २०२२ रोजी पत्र देऊन सदर विभागाचे ना हरकत आलेली असून, वर्क ऑर्डर होऊन काम चालू असून, छत्रपती संभाजीराजे जयंतीपूर्वी लवकरात लवकर पुतळा बसवण्यात यावा अन्यथा प्रोफेसर चौक, अहमदनगर येथे अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेच्या वतीने ११ मे रोजी आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

Require Urgently
Accountant - 2 Post
(Knowledge of Tally required)
- Contact -
M. R. BHINGARWALA
Manik Chowk, Ahmednagar
(Sunday Closed)

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

अक्षयतृतीयेचा मुहूर्त साजरा करा सुमधुर आंब्यांनी
हापूस । पायरी
म्हैसूर लालबाग
ओरिजनल देवगड
रत्नागिरी हापूस
आंबे योग्य भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
खाबिया बंधू आंबेवाले
फसवे भाव नाही, फसवा माल नाही !!!
हातमपुरा, पावन हनुमान रोड, अ. नगर.
9422228616, 9822777735

आमच्या असंख्य चोखंदळ ग्राहकांना अक्षय तृतीयेच्या हार्दिक शुभेच्छा!
अक्षय तृतीयाच्या शुभ मुहुर्तावर आंबे कोठून आणणार...
फक्त नवीपेठ येथून
पप्पू पमनदास आहुजा दालनात
आंबे..आंबे..
लालबाग । म्हैसूर
रत्नागिरी हापूस । देवगड हापूस
खात्रीशीर व नैसर्गिक आंबे मिळण्याचे एकमेव ठिकाण
पप्पु पमनदास आहुजा
आधुनिक कुरिअर समोर, नवीपेठ, अ.नगर.
9552633955 / 9890057353
9028248987

अक्षय तृतीयासाठी अस्सल हापूस आंब्याचे नैव्यद्य
आमच्याकडे उच्च दर्जाचे आंबे योग्य दरात मिळतील
Bhandari The Name You Trust
भंडारी मँगो हाऊस
प्रो.प्रा. कुशल जं. भंडारी
मो. 9823593168
देवगड, रत्नागिरी हापूस आंबे थेट बागेतून आपल्या घरात...
नैसर्गिकरित्या पिकवलेले आंबे खा ! निरोगी रहा
पत्ता : अक्षता सारीज मागे, डिसेंट प्रिंटर्स जवळ, नवीपेठ, अ.नगर. मो. 9823593168

ही जाहिरात दाखवा आणि मिळवा स्मॉल मॉकटेल फ्री..फ्री
UFO Fries & Corn
प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर
टिप : २००/- रु. किंवा अधिकच्या खरेदीवर ही ऑफर लागू.*

आपल्या विचारांचा वारसा जपत राहू निरंतर..
मा. केंद्रीय मंत्री
मा.खा. दिलीपजी गांधी साहेब
(जन्म दि. ९ मे १९५१)
जयंती दिनी विनम्र आदरांजली
श्रीमती सरोज गांधी
अनिल गांधी | श्रीमती छाया गांधी
देवेंद्र गांधी | सुवेंद्र गांधी
सौ. प्रगती गांधी | सौ. दीप्ती गांधी
पंकज व रवींद्र गांधी
चि. राजवीर, चि. ईशान व चि. पार्थ
व्हेरा एल. ई. डी. लाईट प्रा. लि. | चैतन्य ऍक्वा लि.
सुवेंद्र एन्टरप्रायजेस | मनसुख मिल्क प्रा. लि.
गांधी परिवार

अहमदनगर येथे
आरोग्यम आयुर्वेद क्लिनिक
माऊली सभागृहगेट समोर झोपडी कँटीनच्या मागे सावेडी
प्रत्येक मंगळवार व गुरुवार
वेळ सकाळी १० ते रात्री ८ वा
पचनाचे व पोटाचे विकार
त्वचा विकार व सोरायसिस
सांध्याचे व मणक्याचे विकार
मधुमेह व हृदयरोग निवारण
मुतखडा व लघवीचे आजार
सौंदर्य सल्ला व उपचार
डॉ सागर दादासाहेब कड
आयुर्वेद व पंचकर्मतज्ञ
संपर्क क्र 9767670044
राहुरी येथे
ग्लोबल हेल्थ केअर सेंटर
सोमवार बुधवार शुक्रवार शनिवार

सुवर्णखरेदी शुभक्षणांची, अक्षय्य आनंदाची, समृध्दीची..
अक्षय्यतृतीया
ही अक्षय्यतृतीयेला आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत विशेष ऑफर..
मजुरीवर 20%* - विशेष सूट -
ऑफर 22 कॅरेट दागिन्यांवर लागू*
ऑफर 9 मार्च ते 12 मार्च 2024 पर्यंत लागू*
अक्षयसमृध्दी योजना 12=13.5 | सुवर्णसंचय योजना 12=13
आकर्षक व नाविण्यपुर्ण अलंकार खरेदीने अक्षय्यतृतीयेचा हा मंगलक्षण अधिक अविस्मरणीय बनवूया, आजच सुवर्णखरेदी करूया.
ही योजना आमच्या अहमदनगर/श्रीरामपुर/कडा या तिन्ही शोरूममध्ये चालु आहे.
शुध्दता और सुंदरता साथ साथ
चंदुकाका -ज्वेलर्स-
– सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी –
वसंत टॉकिज रोड, अहमदनगर 0241-2321512 | बेलापूर रोड, श्रीरामपुर 02422-221512 | धामणगांव रोड, कडा 02441-239538
आमच्याकडे खरेदी केलेल्या सोने-चांदीच्या दागिन्यांची मोडतेवेळी घट धरली जात नाही.

DISHA COMPUTER INSTITUTE
MAHA DISCOUNT
Just in 1800 Any Course offer
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME PHOTOSHOP, CORELDRAW, ILLUSTRATOR INDESIGN, C, C++, HTML, 2D CAD, 3D CAD
JOIN TODAY
FEATURES OF DISHA E-LEARNING APP
Delhi Gate Branch 9371051769 | Old ST stand Branch 9371151769 | Pipeline Branch 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## शस्त्रास्त्र - उत्पादन, निर्यात - हम भी कुछ कम नहीं...

मागील दशकाच्या अगोदरपर्यंत आपल्या शस्त्रविषयी परिस्थिती बरीच चिंताजनक होती. आपल्या देशाच्या सीमा सहा देशांशी जोडल्या गेल्या असून जगातील तिसऱ्या क्रमांकाचे लष्कर बळ आपल्या देशाकडे आहे. केंद्र सरकारचे संरक्षणविषयक खूपच आक्रमक आहे. 'सर्जिकल स्ट्राईक' आणि चीनला डोकलाम, गलवानमध्ये अरे ला का रे करण्याची हिंमत दाखवण्यात आली आहे.

लष्कराचे आधुनिकीकरण व देशांतर्गतच (Made In India) शस्त्रनिर्मिती करून निर्यातीवर प्रयत्नपूर्वक भर दिला आहे. २०११ ते २०२० पर्यंत शस्त्र आयात ३५% पर्यंत घटवली. थेट परकीय गुंतवणूक ७४% पर्यंत वाढवली. (अपवादात्मक स्थितीत सरकारी मंजुरीने १००%) सध्या आत्मनिर्भर दृष्ट्या स्वदेशी बनावटीच्या






तोफा, रणगाडे, हॅलीकॉप्टर बनवून निर्यातही करत आहोत.

२ वर्षापूर्वी ब्राह्मोस क्षेपणास्त्रे फिलीपाईन्सला निर्यात करण्याची अभूतपूर्व ३७ कोटी डॉलर्सचा करार झाला. या आत्मनिर्भरतेमुळे संरक्षण सक्षम होईल शिवाय बहुमोल्य परकीय चलन मिळते.

तात्पर्य आत्मनिर्भरतेबरोबरच अत्याधुनिक शस्त्रांच्या निर्यातीने जागतिक वजन वाढवत भारताने हम भी कुछ कम नहीं हे दाखवले आहे. अशाच उज्वल वाटचालीस शुभेच्छा!

# उपोषणासाठी उभारलेला मंडप हटविण्याच्या कारवाईत पोलिसांनी केलेल्या 'तोडपाणी' प्रकाराची चौकशी करावी

### पोलिस अधीक्षकांसह नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांचा अवमान करणाऱ्या सपोनि. राजगुरु यांना निलंबित करा अन्यथा वरिष्ठांकडे दाद मागणार

नगर - नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांच्या उपोषणादरम्यान जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर उभारण्यात आलेला मंडप जप्त करून मंडप व्यावसायिकाशी आर्थिक तोडपाणी केल्याप्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी. तसेच पोलिस अधीक्षक अवमान करणारे भिंगार कॅम्प पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक राजगुरु यांना तत्काळ निलंबित करण्यात यावे अन्यथा पोलिस महासंचालक व पोलिस महानिरीक्षकांकडे दाद मागण्यात येईल, असा इशारा बँक बचाव संघर्ष समितीचे डी.एम. कुलकर्णी यांनी दिला आहे.

यासंदर्भात कुलकर्णी यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला यांना निवेदन दिले असून, त्यात म्हटले आहे की, नगर अर्बन बँकेतील दुर्धर आजारी व्याधीग्रस्त असहाय्य माता, भगिनी, वयोवृद्ध ज्येष्ठ ठेवीदार दैनंदिन जिवन जगणे मुश्किल झालेल्या ठेवीदारांनी त्यांच्या संतापाच्या तीव्र उद्रेकातून पोलिस व जिल्हा अधिकारी प्रशासन यांचे लक्ष वेधणे हेतू ३ मे रोजी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता. हे आंदोलन अहमदनगर पोलिस अधिक्षक कार्यालयाचे महामार्गावरील मोठे गेट जवळ करण्याचे नियोजित केले होते.

या आंदोलनाची सविस्तर माहिती व बँकेतील अन्य घोटाळयांची इतंबूथ माहितीचे एक निवेदन मी २२ एप्रिल रोजी माझ्यासह १५ ते २० त्रस्त ठेवीदार, बँकेचे ज्येष्ठ सभासद व बँक बचाव संघर्ष समितीचे ज्येष्ठ पदाधिकारी व ज्येष्ठ ठेवीदार राजेंद्र चोपडासह राकेश ओला यांना त्यांच्या दालनात समक्ष भेटून निवेदनाची प्रत त्यांच्या हातात दिली. त्यांनी ते निवेदन वाचून त्यावर त्यांनी काही अभिप्राय, शेरे मारून ती प्रत त्यांच्या ताब्यात ठेवून घेतली. या निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदात आंदोलनस्थळी ठेवीदारांना उन्हाचा त्रास होऊ नये, या हेतूने सावलीसाठी मंडप टाकणे व त्यासाठी अनुमती मिळण्याबाबत उल्लेख केलेला आहे.

त्यांच्या दालनातून बाहेर पडण्यापूर्वी परत मी श्री. ओला यांना आंदोलनाची थोडक्यात माहिती देतांना या आंदोलनात असहाय्य माता, भगिनी, वयोवृद्ध ज्येष्ठ ठेवीदार तसेच बाहेर गावाहून काही ठेवीदार सहभागी होणार आहेत. मे महिना असल्याने उन्हाचा ठेवीदारांना त्रास होऊ नये, यासाठी या ठिकाणी छोटा मंडप टाकत आहोत व त्यास आपली अनुमती असावी, अशी स्पष्ट कल्पना दिलेली असल्याने त्यांनीही 'ऑल राईट, करा' असे उद्‌गार काढलेले आहेत.

२२ एप्रिल रोजी दुपारपासून ते आंदोलनपूर्व २ मे रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत या आंदोलनसंदर्भात तुम्हास हे आंदोलन करता येणार नाही किंवा या आंदोलनासाठी मंडप वगैरे टाकता येणार नाही, असे कोणतेही व काहीही लिखीत अथवा माझे भ्रमण ध्वनीवरूनही कळविण्यात आलेले नाही. आम्ही ३ मे रोजी त्यांची अनुमती गृहीत धरून सकाळी ८:३० ते ९ वा. मंडप व्यावसायिकास घेऊन मंडप उभारणीस सुरूवात केली. जवळपास मंडप उभारून ही झाला होता. तेवढयात त्या ठिकाणी भिंगार पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक राजगुरु व त्यांचे काही सहकारी आले. या ठिकाणी तुम्हास मंडप टाकता येणार नाही. ताबडतोब मंडप काढून घ्या, अशी तंबी दिली.

माझ्यासह काही उपस्थित ठेवीदारांनी 'आम्ही राकेश ओला यांना २२ एप्रिल रोजी समक्ष भेटून निवेदन व अर्ज दिलेला आहे व त्यात मंडप टाकण्याची अनुमती मागितली आहे'. त्यासंदर्भातील निवेदनाची स्थळ प्रत त्यांना दाखवली व त्यांच्या अनुमतीने ठेवीदारांच्या सोयीसाठी मंडप टाकीत आहोत. आपणही समजून घ्यावे, असे विनवणीपूर्वक त्यांना सांगण्याचा प्रयत्न केला असता ते ठिकाण भिंगार पोलिस स्टेशनच्या हद्दीत येते, तुम्ही आमच्याकडे काहीही कळविलेले नाही. भिंगार पोलिस अधिक्षक कार्यालयाचा व आमचा काहीही संबंध नाही. तुम्हाला या ठिकाणी मंडप टाकता येणार नाही, असे त्यांनी बजावले. त्यांना आम्ही आपल्यापेक्षा जिल्हा पोलिस अधिक्षक हे जिल्ह्याच्या पोलिस दलाचे प्रमुख आहेत. तुमचे भिंगार पोलिस स्टेशनही त्यांच्याच अधिकारात येते. तुम्ही आम्हा ठेवीदारांबरोबर हुज्जत न घालता श्री. ओला यांच्याकडे संपर्क करा व त्यांना विचारा, असे समजावून सांगण्याचा पुरेपूर प्रयत्न केला परंतु त्यांच्यावर काहीही परिणाम झाला नाही व त्यांनी त्या मंडप व्यावसायिकाला मंडप काढून टाकण्यास भाग पाडले.

खाकी वर्दीचा माज व उन्माद मंडप काढून टाकणेपर्यंत मी समजू शकतो. आंदोलनस्थळ जर भिंगार पोलिस स्टेशनच्या हद्दीत येते म्हणजेच जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय व त्यातील सर्व अधिकारी व सर्व पोलिस दल तसेच त्यांच्या नजिकचे जिल्हा न्यायालय हे सुद्धा भिंगार हद्दीतच येते. एकाच हद्दीत असणाऱ्या कार्यालयातील श्री. ओला हे तुमचे प्रमुख अधिकारी ठरतात. त्यांना दिलेले निवेदन भिंगार पोलिस स्टेशनकडे दिलेले ठरते. त्यामुळे तुम्हास वेगळे निवेदन देण्याचे प्रयोजन नाही, हा एकाच घरातील घरगुती मामला ठरतो. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाने याविषयी तुम्हास अवगत करणे अपेक्षीत होते व आहे तसेच तुम्हीही वरिष्ठांकडे विचारणा करणे अपेक्षित असून, तुम्हा दोघांमधील हा समन्वयाचा अभाव आहे. ही वस्तुस्थिती समजून न घेता राज गुरव यांनी त्यांच्या अधिकाराचा केलेला दुरूपयोग व मनमानी हे ठेवीदारांचा अपमान आहे, शिवाय त्यांचे वरिष्ठ श्री. ओला यांचाही अवमान आहे.

त्यांनी त्या मंडप टाकणाऱ्या व्यावसायिकास मंडप साहित्य व त्यांचे वाहन जप्त करण्याची धमकी देऊन मंडप साहित्यासह ते वाहन भिंगार पोलिस स्टेशनमध्ये नेऊन त्या ठिकाणी मंडप व्यावसायिक व त्यांचे वाहन चालक यांना नाहक डांबून ठेवले. यामध्ये त्या मंडप व्यावसायिकाचा काय दोष व काय संबंध? आम्ही त्यांना मंडप टाकण्यास सांगितले त्यात त्याचा काय गुन्हा? मंडप काढून मे महिन्याचे कडक तळपत्या उन्हात वयोवृद्ध माता, भगिनी, ज्येष्ठ ठेवीदारांना उपोषण करण्याची शिक्षा दिली, हे पुरेसे नव्हते का? त्या मंडप व्यावसायिकास नाहक डांबून बसून ठेवले, त्यामुळे त्याच्या दुसऱ्या कामावर त्याचा परिणाम झाला. वेळ गेला, मनस्ताप झाला, इतक्यावरच भागले नाही तर सायंकाळी ५ वाजेपर्यंत डांबून ठेवल्यानंतर पोलिस अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीत तेथील अन्य पोलिस कर्मचाऱ्यांनी त्या व्यावसायिकास जवळपास ८ ते १० हजाराची तोडपाणी करून सोडून दिले, ही गंभीर घटना आहे.

ही बाब आम्हाला समजल्यानंतर धक्का तर बसलाच परंतु आमची नैतिक जबाबदारी म्हणून एकमेकांच्या विचारविनिमयातून त्या व्यावसायिकास ती रक्कम द्यावी लागली. ती रक्कम सुद्धा ठेवीदाराने वर्गणीच्या स्वरूपात दिलेल्या रकमेतून दिलेली आहे. म्हणजेच हा भुर्दंडही ठेवीदारांना सहन करावा लागला.

श्री. ओला यांनी या गंभीर प्रकाराची त्वरीत चौकशी करून राज गुरव यांना तात्काळ निलंबीत करावे व या पोलिस स्टेशन अंतर्गत झालेल्या आर्थिक तोडपाणी प्रकाराची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, पुरेशा अवधीत कारवाई न झाल्यास पोलिस महासंचालक मुंबई व पोलिस महानिरीक्षक नाशिक यांच्याकडे धाव घ्यावी लागेल, असा इशारा श्री. कुलकर्णी यांनी दिला आहे.



पिपल्स हेल्पलाईनच्यावतीने महाराष्ट्रदिनी हुतात्मा स्मारक येथे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हुतात्मा झालेल्यांना पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन करताना प्रकाश थोरात, रावसाहेब रंधवे, संदीप पवार, सुनील भोसले, अशोक भोसले.

## पीपल्स हेल्पलाईनच्यावतीने हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र

नगर - पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने महाराष्ट्र दिनी हुतात्मा स्मारक येथे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात हुतात्मा झालेल्यांना अभिवादन करण्यात आले. हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करुन महाराष्ट्राचा जयघोष करण्यात आला. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी उप महाव्यवस्थापक रावसाहेब रंधवे, पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात, आधार सामाजिक संघटनेचे संदीप पवार, सुनिल भोसले, अशोक भोसले आदी उपस्थित होते.

प्रकाश थोरात म्हणाले की, महाराष्ट्राचा ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक वारसा फार मोठा आहे. देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत आणि त्यानंतरही देशाच्या प्रत्येक विकासात्मक कार्यात महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अनेक हुतात्मे झाले. त्यांना नमन करुन महाराष्ट्र दिन साजरा होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रावसाहेब रंधवे यांनी देशाच्या जडण-घडणीमध्ये महाराष्ट्राने मोठा वाटा उचलला आहे. सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र देशाचा कणा बनला असल्याचे त्यांनी सांगितले.

## झाडाला गळफास घेवून आत्महत्या

नगर - घराशेजारी असलेल्या झाडाला गळफास घेत एकाने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथे मंगळवारी (दि.७) घडली. अरुण भीमा सोनवणे (वय ४२, रा. पिंपळगाव माळवी, ता.नगर) असे या मयत इसमाचे नाव आहे.

मयत अरुण सोनवणे यांनी घराशेजारील झाडाला दुपारच्या सुमारास गळफास घेतला. ही बाब निदर्शनास आल्यावर त्यांना त्यांचे नातेवाईक विकास गुलाब गायकवाड यांनी तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी नेले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून सोनवणे यांनी आत्महत्या का केली याचा शोध पोलिस घेत आहेत.

## विनायकराव रणसिंग यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील मल्हार चौकातील रहिवासी ओम उद्योग समूह व माऊली ट्रॅक्टरचे प्रमुख विनायकराव खासेराव रणसिंग (उर्फ बापूसाहेब, वय ८०) यांचे ७ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, अमोल व किरण ही २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## पाटीलबा राहिंज यांचे अपघाती निधन



नगर - काष्टी, राहिंजवाडी (ता. श्रीगोंदा) येथील रहिवासी पाटीलबा गेनबा राहिंज (वय ५५) यांचे ७ मे रोजी राहिंज मळ्याजवळील जाईबाई वस्ती येथील पेट्रोल पंपाशेजारी अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, सुन असा परिवार आहे.

## काशिनाथ खोसे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पाडळीदर्या (ता.पारनेर) येथील रहिवासी काशीनाथ महादेव खोसे पाटील (वय ८४) यांचे ८ मे रोजी सकाळी ७ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर गावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

खोसे हे पाडळीदर्या विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे माजी व्हा.चेअरमन होते. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका उपाध्यक्ष सुरेश खोसे पाटील व नगरमधील हेल्थ केअरचे संचालक दिलीप खोसे पाटील यांचे ते वडील होत. त्यांच्या पत्नी, ३ मुले, १ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

सेवानिवृत्त मलेरिया अधिकारी

## पोपटराव कोळपकर यांचे हृदयविकाराने निधन



नगर - सावेडीतील निर्मलनगर मधील रहिवासी पोपटराव दत्तात्रय कोळपकर (वय ७८) यांचे ४ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

कोळपकर हे मलेरिया विभागातून आरोग्य अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले होते. ते महाराष्ट्र राज्य कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष होते. महालक्ष्मी सिमेंटचे संचालक प्रशांत कोळपकर यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## भगवानराव शेवंते (सर) यांचे दुःखद निधन



श्रीरामपूर - येथील शेवंते क्लासेसचे संचालक भगवानराव भाऊराव शेवंते (सर) (वय ७८) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.कौस्तुभ शेवंते व सौरभ शेवंते यांचे वडील होत.

# महापालिका उद्यानाची झालेली वाताहात व सुरु असलेली लूट थांबविण्यासाठी बागोड्या सत्याग्रह

### आयुक्तांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास विजेच्या खांबाला डांबून करणार आंदोलन

नगर - शहरातील मनपा उद्यानाची झालेली वाताहात, काही उद्यानात सर्वसामान्यांची सुरु असलेली लूट थांबवून लहान मुलांना मोफत व आनंदी खेळाचा अधिकार मिळण्यासाठी पीपल्स हेल्पलाईनच्या लोकभज्ञाक चळवळीच्या माध्यमातून बागोड्या सत्याग्रह जारी करण्यात आला आहे. राजकीय नेत्यांच्या पंटरांना उद्यानाची खैरात करणारे व उद्यानाकडे दुर्लक्ष करणारे महापालिकेचे आयुक्तांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास लक्ष्मी उद्यानात विजेच्या खांबाला डांबून १८ मे रोजी बागोड्या सत्याग्रह केला जाणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.



शहरातील सर्व सार्वजनिक उद्यानात मोठी लूट सुरु आहे. मरक्या घोड्यावर बसण्यासाठी ३० रुपये घेतले जातात. काही उद्यानात ठेकेदाराने मोठ्या प्रमाणात खासगी झोके लावले असून, ते नागरिकांकडून अव्वाच्यासव्वा रुपये वसूल करत आहे. उद्यानात व्यवसाय करणारे खासगी पाळणे अथवा खेळणे वाल्यांना मनपाने दर निश्चित करुन दिल्यास सर्वसामान्यांनी लूट थांबण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

कोणत्याही उद्यानामध्ये खेण्याची सोय नाही. अनेक खेळणे मोडकळीस आलेले असून, नागरिकांना खासगी पाळण्यांशिवाय पर्याय नाही. सर्व झाडे जळून जात असून, विशेष म्हणजे लक्ष्मी उद्यानासमोर जाणे-येण्याचा रस्त्याच्याकडेला वाहने पार्किंग केल्याने मुलांना उद्यानात जाण्यास देखील अवघड होत आहे. बागोड्या म्हणजे मुलांचा बागडण्याचा आणि आनंद लुटण्याचा अधिकार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

सध्या शाळांना सुट्ट्या लागल्या आहेत. दिवसभर उन्हामुळे मुले घरी असतात, संध्याकाळी मुलांना खेळण्याची संधी उद्यानामध्ये मिळण्याची आवश्यकता आहे. मनपाच्या अनागोंदीमुळे शहरातील उद्यानाची वाताहात झाली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

परदेशामध्ये लहान मुलांच्या आरोग्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. खेळाच्या सोयी मोफत उपलब्ध केल्या जातात. परंतु भारतात लहान मुलांवर अतिशय नकारात्मक संस्कार केले जातात. मुलांना त्यांचा खेळण्याचा हक्क मिळण्यासाठी हे आंदोलन जारी करण्यात आले असल्याचे अ‍ॅड. गवळी यांनी म्हंटले आहे. या आंदोलनासाठी अ‍ॅड. कारभारी गवळी, शाहीर कान्हू सुंबे, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, डॉ. रमाकांत मडकर, ओम कदम आदी प्रयत्नशील आहेत.

## विश्व हिंदू परिषदेचा हिंदू जनसंवाद मेळावा



शंकर गायकर

नगर - पटेल मंगल कार्यालय, न्यू टिळक रोड येथे ८ मे रोजी सायंकाळी ७ वाजता विश्व हिंदू परिषदेच्या वतीने नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंदू जनसंवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी प्रमुख वक्ते विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सह मंत्री शंकर गायकर मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी महाराष्ट्र-गोवा मुंबई क्षेत्राचे बजरंग दलाचे क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर यांनी दिली आहे.

# युवकावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या ९ जणांवर गुन्हा दाखल; ६ जणांना स्थानिक गुन्हे शाखेने पकडले; तिघांचा शोध सुरु

नगर - बुऱ्हाणनगर - नागरदेवळे रोडवर सोमवारी (दि.६) रात्री युवकावर प्राणघातक हल्ला केल्या प्रकरणी या हल्लयात जखमी पुष्कर संतोष शेलार (रा. नागरदेवळे, ता. नगर) याच्या जबाबावरून मंगळवारी (दि.७) दुपारी उशिरा ९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यातील ६ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडून भिंगार कॅम्प पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. तर फरार असलेल्या तिघांचा शोध सुरु आहे.

तक्रादार पुष्कर शेलार हे नागरदेवळे गावातुन त्यांचे मित्रासोबत किराणा माल घेवुन घरी जात असतांना सोहेल चाँद शेख (रा. नागरदेवळे) व त्याचे इतर साथीदारांनी शेलार यास तलवार, लाकडी दांडके, लोखंडी गजाने जिवे ठार मारण्याचे उद्देशाने मारहाण केली. तसेच शेलार याचा मित्र यास सुध्दा शिवीगाळ दमदाटी करुन लाथाबुक्कयांनी मारहाण केली होती. सदर घटनेबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात ९ जणांच्या विरुद्ध भा.दं.वि. कलम ३०७, ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४८, १४९, आर्म ऍक्ट कायदा कलम ४/२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३)/ १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



बुऱ्हाणनगर - नागरदेवळे रोडवर युवकावर प्राणघातक हल्ला करणाऱ्या ६ आरोपींना पकडल्या नंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांना आरोपीचा शोध घेणेबाबत आदेश दिले होते. या आदेशान्वये पो.नि.आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक तुषार धाकराव, पोलीस अंमलदार भाऊसाहेब काळे, मनोहर गोसावी, दत्तात्रय गव्हाणे, रविंद्र कर्डीले, संतोष खैरे, रोहित मिसाळ, फुरकान शेख, शिवाजी ढाकणे, रणजित जाधव, संतोष लोढे, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, सचिन अडबल अरुण मोरे यांचे दोन पथके तयार करुन आरोपीची माहिती काढुन आरोपींना ताब्यात घेणेबाबत पथकास सुचना व मार्गदर्शन करुन रवाना केले होते.

या पथकाने गुन्हा ठिकाणी भेट देवुन गुन्ह्याचे पार्श्वभुमीची माहिती घेतली. सदर गुन्ह्यातील आरोपींनी गुन्हा घडल्यानंतर लगेच मोबाईल फोन बंद केलेले असल्याने आरोपीविषयी काहीएक माहिती मिळुन येत नव्हती. वरील दोन्ही पोलीस पथके आरोपींचे मुकुंदनगर येथील नातेवाईकांकडे माहिती काढत असतांना मंगळवारी (दि.७) पो. नि. आहेर यांना सदरचे आरोपी हे मुकुंदनगर या ठिकाणी एका शेडमध्ये लपुन बसलेले असल्याची माहिती प्राप्त झाली. ही माहिती त्यांनी तात्काळ पथकास कळवुन आरोपींना ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्या.

त्यानुसार पोलीस पथकाने त्या ठिकाणी जावुन पाहणी केली असता एका पत्र्याचे शेडमध्ये ६ इसम बसलेले दिसले. सदर इसमांना ताब्यात घेण्यात आले. यामध्ये सोहेल चाँद शेख (वय २६, रा. बुऱ्हाणनगर रोड, नागरदेवळे), शोएब चाँद शेख (वय २६, रा. सदर), शोएब हमीद सय्यद (वय २३, रा. गोटीची तालीमजवळ, नागरदेवळे), अमीन हुसेन पठाण (वय २१, रा. सदर), साहील अकबर पठाण (वय २८, रा. मराठी शाळेमागे, नागरदेवळे), रियाज उर्फ बाबा मुनीर पठाण (वय ३०, रा. विठ्ठल रुख्मीनी मंदीराजवळ, नागरदेवळे) यांचा समावेश आहे. तर शाहीद अकबर पठाण, साहिल हमीद सय्यद, अर्शद शेख हे तिघे फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींना पुढील तपासकामी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### केस का गळतात?

केस गळण्याच्या समस्यांमधे केस विरळ होणे ते पूर्ण टक्कल पडणे यांचा समावेश असतो. केस अनेक कारणांमुळे गळू शकतात. वैद्यकीयदृष्ट्या, केस गळणे हे अनेक श्रेणींमध्ये विभागता येते, त्यामध्ये दीर्घकाळ चाललेला आजार, मोठी शस्त्रक्रिया किंवा गंभीर संक्रमण यांसारख्या प्रमुख शारीरिक तणावानंतर दोन ते तीन महिन्यांत केस गळणे ही सामान्य स्थिती आहे. संप्रेरकांच्या पातळीत अचानक बदल होणे, विशेषतः महिलांमध्ये प्रसुतीनंतर असा बदल होण्याने केस गळतात. मध्यम प्रमाणात केस गळतात परंतु मोठ्या प्रमाणात चट्टे पडणे हे दुर्मिळ आहे. ठराविक औषधांच्या दुष्परिणामांमुळे केस गळू शकतात आणि अचानक केस गळून संपूर्ण डोके प्रभावित होऊ शकते.

## पाककला

### पांढरा ढोकळा

**साहित्य** – उडीदडाळ दीड कप, तांदळाचा रवा ४ कप, दाटसर आंबट ताक अडीच कप, हिरव्या मिरच्या ५, आले कीस अर्धा लहान चमचा, ओले खोबरे कीस दोन चमचे, चिरलेली कोथिंबीर दोन चमचे, खाण्याचा सोडा दोन चिमूट, मीठ, तेल.

**कृति** – उडीद डाळ रात्रीच भिजत घाला. सकाळी उपसून त्यात मिरची घालून वाटून घ्या. त्यातच तांदूळ, रवा, ताक व थोडे कोमट पाणी घालून मिश्रण कालवा. त्यावर झाकण ठेवून ४ तास तसेच ठेवा. नंतर या मिश्रणात सोडा घालून ते आले पेस्ट, मीठ यात मिसळून चांगले कालवून घ्या. एका ताटास तेलाचा हात फिरवून त्यावर वरील मिश्रण सारखे, पातळ पसरून नेहमीप्रमाणे बारा–पंधरा मिनिटे वाफवून निवल्यावर त्याच्या वड्या पाडा. मग त्यावर नारळ कीस व चिरलेली कोथिंबीर पसरून घाला.

## सौंदर्य

### उजळ चेऱ्यासाठी

उडीद डाळीची पावडर बनवून त्यात थोडेसे गुलाबपाणी, ग्लिसरीन व बदाम रोगन मिसळून चेहऱ्यावर लावावे. यामुळे चेहरा उजळतो.

## सल्ला

पेढे उरल्यास कुस्करून दुधात घालून बासुंदी करावी.

बल्ब पेटवण्यापूर्वी (लाईट लावण्यापूर्वी) त्यावर अत्तर किंवा कोलोनचे एखादा थेंब टाकल्यास रुममध्ये सुगंध पसरेल; परंतु ते कधीही तापलेल्या बल्बवर टाकू नये.

## वास्तू

पूर्व ही 'सूर्योदयाची दिशा' होय. ही फार मोठी प्रतिष्ठा या दिशेच्या वाट्याला आली आहे. या दिशेला 'विजयाची दिशा' असेही म्हटले जाते. ही दिशा शक्ती व सामर्थ्य प्राप्त करून देणारी दिशा आहे, अशी वास्तुशास्त्राची धारणा आहे. या दिशेहून येणारी सकाळची कोवळी सूर्यकिरणे अंगावर घेतल्यामुळे अनेक आजारधुपारांपासून मुक्ती मिळते. ज्ञानोदयासाठी योगी, विद्यार्थी,विद्वान तोंड पूर्वेकडे करून झोपण्याचा नियम कटाक्षाने पाळतात. मानसिक विकार झालेल्या रुग्णाला पूर्व दिशेकडे तोंड करून झोपवल्याने त्याची मानसिक स्थिती झपाट्याने सुधारते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. ९ मे २०२४

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, कृत्तिका ११।५५

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य–**

**मेष** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल. परंतु, घाई करणे वादाला कारण ठरू शकते. व्यापार–व्यवसायात स्थिती अनुकूल राहील.

**वृषभ** : आज रात्री विश्रांती घ्या. घर बदलण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे. शत्रू प्रभावहीन ठरतील. कौटुंबिक वातावरण सुखद राहील. आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे.

**मिथुन** : आजचा दिवस आपल्यासाठी नवीन सुरुवात करणे किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय निर्धारित करण्यात सहायक ठरेल. आर्थिक प्रयत्नांमध्ये स्थिती अनुकूल राहील.

**कर्क** : आपल्या जीवनातील इच्छित वस्तूवर लक्ष द्या. कौटुंबिक प्रकरणांमध्ये कोणत्याही प्रकारचे विवाद टाळा. वैवाहिक सुख वाढेल.

**सिंह** : नोकरदार व्यक्तींनी कार्यात सहयोग घेऊन चालावे. कौटुंबिक प्रश्नांचे निराकरण होईल.

**कन्या** : प्रसिद्धी मिळेल. अडकलेली कार्ये योग्य वेळी होतील. नोकरदार व व्यापारी बंधूंना लाभ मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल.

**तूळ** : नेहमीपेक्षा अधिक चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**वृश्चिक** : व्यापार–व्यवसायात स्थिती नरम–गरम राहील. आरोग्य उत्तम राहील व एखाद्या जुन्या मित्राशी भेट होण्याची शक्यता आहे.

**धनु** : एखाद्या जीवलगाबरोबर भागीदारीसाठी वैयक्तिक पातळीवर संबंध वाढविण्याचा प्रयत्न करा. निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका.

**मकर** : वाहने व उपकरणे जपून चालवा नाहीतर नुकसान होण्याची संभावना आहे. आनंदाची बातमी मिळेल.


**कुंभ** : व्यापार–व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल.

**मीन** : एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल. मानसिक स्थिती आनंददायक राहील. वैवाहिक जीवनात सुख मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# शब्दगंध क्र. ६९१९

सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :–** १) ज्याला कामधंदा नाही व जो नुसता बसून आहे असा ७) उत्तराधिकारी; हक्कदार ८) व्यवस्थित; बरोबर १०) पाणी; नीर; जीवन ११) मोठा हातोडा १२) निवडणुकीत याचे दान करतात १३) रुबाब; ऐट; तोरा १५) कल्याण; पवित्र; शुद्ध १७) एक पालेभाजी १९) जाड दोरी २०) कपाळ; ललाट २१) सकाळच्या वेळी गवताच्या पात्यावर दिसतात ते बाष्पीभवनापासून तयार झालेले जलबिंदू २२) पगार; पेमेंट २४) एक केसाळ प्राणी; अस्वल २५) घट्ट धरून ठेवण्याचे हत्यार; चिमटा

**उभे शब्द :–** १) पद्धत; चाल; तऱ्हा २) तेल निघणारे एक धान्य ३) त्वचेवरील काळा डाग; चामखीळ; तीळ ४) सोपे नसलेले; अवघड; दुर्गम ५) पोस्ट; टपाल; मेल ६) चकचकीत; लखलखीत; तेजस्वी ९) पक्का; दृढ; निश्चयी ११) मेघ; ढग; आभाळ .. १३) पांघरण्याचे एक उंची वस्त्र १४) चिखल १५) रावणाच्या पत्नीचे नाव १६) उशिरा पिकणारे धान्य १७) चालण्याची ढब; रीत; रिवाज १८) लग्नानंतर निघणारी वधुवराची मिरवणूक २०) भारतातील एक राजकीय पक्ष २२) मेंदूवर परिणाम होऊन विचित्र वागणे २३) नाटक, चित्रपटात भूमिका करणारा

**शब्दगंध क्र. ६९१८ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बो | ला | चौ | च | क | डी | ■ | अ |
| ज | ■ | त्का | ■ | सा | ग | वा | न |
| वा | ■ | र | ज | ब | ■ | स | वा |
| रा | धा | ■ | स्त | ■ | मु | ला | णी |
| ■ | व | ळ | ■ | ज | का | त | ■ |
| वा | क | ■ | श | र | द | ■ | भा |
| म | ■ | वे | त | ■ | म | शी | द |
| न | थ | ■ | क | ह | ■ | त | वा |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : दुर्जनांशी चांगुलपणाने वागणे म्हणजे सज्जन लोकांबरोबर वाईटपणाने वागल्यासारखे आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### गोंगाटामुळे काय दुष्परिणाम होतात?

गोंगाटामुळे परीक्षेच्या काळात अभ्यासात लक्ष लागत नाही, मन एकाग्र होत नाही; हे तुम्ही नक्कीच अनुभवले असेल. कारण वैयक्तिक वा सार्वजनिक आनंदाच्या कोणत्याही प्रसंगी मोठ्या आवाजात लाउडस्पीकरवर गाणी लावून गोंधळ घालायचा प्रकार आपल्याकडे आहे. भले मग कोणाचे कान बहिरे का होईनात!

चुकीच्या वेळी, चुकीच्या जागी, चुकीचा आवाज म्हणजेच गोंगाट होय.

आवाजाची तीव्रता डेसीबल या एककात मोजतात. माणूस ८५ डेसीबल इतक्या तीव्रतेपर्यंतचा आवाज सहन करू शकतो. तसेच २० ते २०,००० हर्ट्झ एवढ्या वारंवारतेचा आवाजच तो ऐकू शकतो.

गोंगाटाचे अनेक दुष्परिणाम होतात. यात कानात आवाज होणे, दडे बसणे, थकवा येणे तसेच बहिरेपणा यांचा समावेश होतो. गोंगाटामुळे संवाद साधण्यात अडथळा येतो. चिडचिडेपणा येतो. काम करण्याची व्यक्तीची क्षमता कमी होते. याखेरीज गोंगाटात रक्तदाब वाढतो, नाडीचे ठोके वाढतात, श्वसनाचा दर वाढतो; तसेच घाम येण्याच्या प्रमाणातही वाढ होते. अशा प्रकारे गोंगाटामुळे अनेक दुष्परिणाम होतात. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी आवाज जेथे निर्माण होतो तेथेच त्यावर नियंत्रण ठेवणे, ध्वनिरोधक साधनांचा वापर, व्यक्तीचे कानातील बोळ्यांसारख्या साधनांनी आवाजापासून रक्षण करणे इत्यादी उपाय करता येतात.

### खोटेपणाला झाले शासन

एका शेतकऱ्याने घराभोवती मोठी बाग तयार केली. त्यात भाजीपाला, फळांची लागवडही केली. शेजारीच त्याने पाळलेल्या कोंबड्या, कोकरेही चरत असत. त्याच बागेत शेतकऱ्याची नजर चुकवून कोल्हा, लांडगा आणि ससा इकडे तिकडे फिरून आपले पोट भरीत. ही गोष्ट शेतकऱ्याच्या लक्षात न आल्याने ते तिघेही पुन्हा आपल्या घरी सुरक्षित परत जात.

पण एकदा ही गोष्ट शेतकऱ्याच्या लक्षात आल्यावर त्यांना पकडण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी सापळे लावले. त्यात ते तिघेही अडकले. शेतकऱ्याने त्यांना पकडताच ससा गयावया करीत म्हणाला,

''भाऊ मी फक्त थोडासा कोबीचा पाला खाल्ला.तुम्ही जर मला सोडून दिले, तर मी पुन्हा म्हणून तुमच्या मळ्यात पाय ठेवून तुम्हाला त्रास देणार नाही. एक वेळ मला माफ करा.''

तेव्हा कोल्हा लबाडपणे म्हणाला, ''अहो दादा, खरे तर हा ससा आणि इतरजण तुमच्या बागेची नासाडी करतात, म्हणून त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मी येथे येतो. मी कशाला तुमची फळे खाईन? एवढ्यात लांडगा गुरकावून म्हणाला,

''अरे खरे तर या कोकरांवर माझाच हक्क. त्यांना खाण्यासाठी तर मी येथे येतो. तू दुष्टपणे या कोकरांना येथे काय म्हणून डांबून ठेवतोस? या कोकरांना खाल्ल्याशिवाय मी गप्प थोडाच बसणार?''

सर्वांनी केलेली बतावणी ऐकून शेतकरी मनात म्हणाला, खरे बोलणाऱ्या सशाला सोडून दिले पाहिजे आणि लबाड बोलणारा कोल्हा आणि बापाचाच माल असल्यासारखा बोलणारा लांडगा यांनी जे गुण उधळले, त्यांचा समाचार घ्यायलाच पाहिजे. असे म्हणत त्याने त्या दोघांना ठार केले.

**तात्पर्य** : खरे बोलणाऱ्याला क्षमा करणे योग्य, पण खोटेपणाचे समर्थन करणाऱ्याला शासन केले पाहिजे.

## जीवन चक्र



हमें यह धरती ठोस दिखाई देती है, इसकी हर एक चीज़ ठोस नज़र आती है लेकिन आज की research (अण्वेषण) हमें बताती है कि यह एक vibration (हिलोर) की तरह है जो बहुत तेजी से हो रही है और हमें वह हिलोर दिखाई नहीं देती क्योंकि वह बड़ी तेज़ है और एक ठोस चीज़ के माफ़िक दिखाई देती है। जैसे–जैसे अण्वेषण बढ़ती जा रही है, वैज्ञानिको की यही कोशिश है कि वे matter (माद्दे) को छोटे से छोटा करके देखें कि उसमें क्या है और वे इसी नतीजे पर पहुंच रहे हैं कि छोटे से छोटे कण में एक हलचल है, एक धुन है, एक vibration है और जब वे particles (कण) जुड़ते हैं, तो अलग–अलग किस्म की चीजें या objects बनने लगते हैं। इन छोटे–छोटे कणों का जुड़ना और बिछुड़ना, यह प्रभु की एक लिला है । इसी प्रकार जीव इस दुनिया में आता है और कुछ क्षणों के बाद यहाँ से चला जाता है ।

इस जादूगरी को हम किस प्रकार से समझ सकते हैं, उसी के बारे में राजा पीपा जी हमें इस शब्द में समझा रहे हैं। इसी जादूगरी के बारे में बहुत से महापुरुषों ने हमें समझाया है कि कैसे हम इस खेल तमाशे को देखते हुए, इसकी असलियत तक पहुँच सकते हैं। गुरु अमरदास जी ने एक जगह फ़रमाया है :

**बाजीगरि इक बाजी पाई ।। पूरे गुरु ते नदरी आई ।।**

– गुरुग्रंथ साहिब पृ. १०६१

परमात्मा ने एक बाज़ी लगाई है, एक खेल खेला है, जो हमारी समझ से बाहर है क्योंकि हमें तो खेल का बाहरी रूप ही दिखाई देता है। लेकिन जब हम किसी पूर्ण सत्गुरु की शरण में पहुँच जाते हैं, तो वे हमारी नज़र को ठीक कर देते हैं और इस खेल के बारे में हमें सही प्रकार से समझा देते हैं। इस खेल में जो हमें आँखों से दिखाई दे रहा है और कानों से सुनाई दे रहा है, उसे हम ठीक समझते हैं कि यही असलियत है। लेकिन जब हम किसी महापुरुष की शरण में पहुँचते हैं, तो वे हमें समझा देते हैं कि यह एक खेल–तमाशा है और असल की दुनिया बाहर नहीं, बल्कि हमारे अंतर में है, वह अन्दर की दुनिया है। हमारी जिंदगी एक स्वप्न के माफिक चल रही है। जब स्वप्न आता है. तो इंसान सोया हुआ होता है और ऐसा लगता है, जैसे सब कुछ असलियत में हो रहा है। लेकिन जैसे ही नींद से हम जागते हैं, तो हमें मालूम होता है कि हम स्वप्न देख रहे थे। संत दर्शनसिंह जी महाराज ने भी जिंदगी को इसी तरह अपने एक शेर में फ़रमाया है। वे फ़रमाते हैं :

**जिंदगी ख्वाबे–मुसल्सल के सिवा कुछ न सही**
**इसकी तअबीर तो 'दर्शन' को बता दे साकी**

– मताओ नूर, ग़ज़ल–५

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

बरबैक के प्यार के खातिर उस वनस्पति ने भी उनका कहना मान लिया और अपने संरक्षण हेतु जो कांटे थे वे निकालने के लिए तैयार हो गई। उनके पास पेड़–पौधों के साथ संवाद करने की शक्ति थी, प्रेम और स्नेह था। उन्होंने प्रकृति के नियम विरूद्ध एक भी कर्म नहीं किया। इसी कारण १८ अप्रैल, १९०६ के भूकम्प में जब सैनफ्रांसिस्को का विध्वंस हुआ तब बरबैक का मकान भूकम्प केन्द्र बिन्दु के पास ही था, फिर भी उनके मकान के झरोखे का एक काँच भी नहीं टूटा। बरबैक का कहना यह था कि नैसर्गिकता के साथ विलक्षण दोस्ती का सम्बन्ध जुटाने का यह परिणाम है।

महाभारत में भी एक दृष्टांत आता है कि भीष्म पितामह जी ने अपने रथ के नीचे आनेवाले साँप को बचाने के लिये उसे उठाकर बाजू में फेंक दिया, तो वह साँप काँटे के पेड़ पर गिरा और वहाँ ही मर गया। फलस्वरूप भीष्म जी को भी अन्त में बाणों की शैय्या पर लेटना पड़ा। अब इस गुह्य गति को समझकर हमें स्वयं को विकर्मों से बचाना है और श्रेष्ठ कर्म करने हैं।

शाश्वत यौगिक खेती अपनाने के लिए हमें कुदरत के नियमानुसार चलकर विज्ञान के आधार से निसर्ग तथा प्रकृति के पाँचों तत्वों सहित सर्व जीव–जंतुओं, पशु–पंछियों, जमीन, बीज, वृक्ष एवं वनस्पतियों से स्नेह और प्रेम से रिश्ता जोड़ना है। इसके लिए आवश्यकता है आध्यात्मिक शक्तियों की, जो हमें राजयोग से मिलती हैं। राजयोग के अभ्यास में अपनी विशेषताओं द्वारा प्रकृति के पाँचों तत्वों (पृथ्वी, जल, अग्नि, वायु, आकाश) गृह, तारे, जीव, जंतु, पशु, पंछियों को परमात्मा की शक्ति और गुणों के प्रकम्पन देकर सहयोग लेना है।

आज तक हमने अज्ञानता वश प्रकृति को बहुत दु:ख दिया है। पृथ्वी तत्व में केमिकल फर्टिला, फंफूंदीनाशक और खरपतवार नाशक दवाइयों के इस्तेमाल से जमीन की उर्वरक शक्ति हो गई है। आवश्यकता से ज्यादा गहरा हल चलाना, आवश्यकता से ज्यादा पानी का इस्तेमाल करना आदि इन सब कारणों से पृथ्वी को बहुत चोट पहुँची है इसलिए पृथ्वी तत्व भी हमारे ऊपर नाराज है, अब उस पृथ्वी को राज़ी करने के लिए प्रकृतिपति परम त्मा के सम्मुख आत्मिक स्थिति में स्थित होकर मन ही मन, दिल से उनसे माफी मांगना है कि हे धरती माँ! मुझे माफ करो, परमात्मा से सर्वशक्तियों की प्रकाशमय किरणें ज्ञान की, पवित्रता की, प्रेम, सुख, आनंद, शक्ति और गुणों की किरणे मुझ आत्मा में आ रही हैं... । जो मेरे द्वारा पृथ्वी तत्व में प्रकाश की किरणों के रूप में प्रवाहित हो रही हैं...। पूरा पृथ्वी तत्व शुद्ध, पवित्र, शान्त हो रही है..., सुखमय और शक्तिशाली बनती जा रहा है... धरती माँ आनंदित होकर परमात्मा प्रत्यक्षता के लिए सम्पूर्ण सहयोगी बनती जा रही है... और परमात्मा पिता को वचन दे रही है कि यौगिक खेती में फसल की बढ़त के लिए सम्पूर्ण सहयोगी बनकर रहँगी।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**पिंट्या :** जर मी या नारळाच्या झाडावर चढलो तर मला इंजिनिअरींग कॉलेजच्या मुली दिसतील का रे?


**गण्या :** हो... दिसतील की

**पिंट्या :** आणि हात जर सुटला तर

**गण्या :** तर मेडीकल कॉलेजच्या पण दिसतील.

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



एकेकाळी माझे आयुष्य
एखाद्या कळीप्रमाणे होते
त्या कळीचा सुगंध
तीच्या अंगणात भिनलेला होता

**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

विवाह जमवताना मुलाचे शिक्षण, नोकरी, व्यवसाय, ध्येये, आवडीनिवडी, स्वभाव, व्यसन, भाऊ–बहीण, मित्रमैत्रिणी या गोष्टींबरोबरच आरोग्याचाही विचार करावा. केवळ बाह्यरूप, रंग, उंचीला जास्त महत्त्व देऊ नये. उंची, वय, बांधा हे दोघांना अनुरूप आहे की नाही एवढेच बघावे. थोडक्यात, मुलगी तब्येतीने एकदम किरकोळ तर मुलाचे वजन प्रमाणापेक्षा जास्त किंवा मुलगा तब्येतीने एकदम बारीक व मुलीचे वजन खूपच जास्त असा विजोड जोडा असू नये. त्यामुळे कदाचित शारीरिक संबंधांना अडचण निर्माण होऊ शकते. पुढे गर्भधारणेलाही अडथळा निर्माण होऊ शकतो. विवाहाचा मूळ हेतूच दोन भिन्नलिंगी व्यक्तींनी एकत्र येऊन लैंगिक कामजीवन उपभोगणे व त्यातूनच संतती निर्माण करून वंशाचा विस्तार करणे हा आहे. पूर्वीच्या काळी लग्नाच्या आमंत्रण पत्रिकेमध्ये वधू व वर या दोघांचा नावानिशी उल्लेख करून शारीरिक संबंध निश्चित केला आहे व त्याला आपण उपस्थित राहावे, असा स्पष्ट उल्लेख केला जाई. त्यातून विवाहाचा मूलभूत पाया कामजीवनच आहे हे सिद्ध केले जात असे.

सुखी वैवाहिक जीवनाचा पाया संतुष्ट शारीरिक संबंधावर अवलंबून आहे याची जाणीव विवाहेच्छुक मुलामुलींना असायला हवी. त्यासंबंधी तज्ज्ञांचा सल्ला लग्नाआधी जरूर घ्यावा. तसेच संततिप्रतिबंधक उपायांबद्दलची माहिती करून घ्यावी. कारण लग्नानंतर काही मुलींना लगेचच गर्भधारणा होते. मनाची तयारी नसल्यामुळे हा गर्भ नको अशी भावना होते. परंतु गर्भपात केल्यामुळे भविष्यात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. क्वचित प्रसंगी पुन्हा गर्भधारणा होत नाही. असे होऊ नये म्हणून आपल्याला बाळ कधी हवे याचा विचार करून संततिप्रतिबंधक उपाय करावेत. विवाह करण्यापूर्वी कोणाशी असलेले प्रेमसंबंध काही कारणाने तुटले असतील तर त्याबद्दल भावी जोडीदाराला कल्पना द्यायची की नाही याचा निर्णय विचारपूर्वक घ्यावा. मात्र, पूर्वीच्या गोष्टी विसरुन भावी जोडीदारासोबत एकनिष्ठेने वैवाहिक जीवनाला सुरुवात करावी. एकमेकांच्या सुखदु:खात साथ देणे, एकमेकांची काळजी घेणे, कामजीवन उपभोगणे, त्यातून निर्माण होणाऱ्या मुलांचा सांभाळ करणे, मुलांवर योग्य ते संस्कार करून चांगले शिक्षण देऊन उत्तम नागरिक बनवणे, सासू–सासऱ्यांची सेवा, एकमेकांच्या नातेवाइकांचा आदर, प्रेम, जिव्हाळा जपणे या जबाबदाऱ्या आनंदाने आणि जाणीवपूर्वक पेलल्या पाहिजेत. (क्रमश:)

**– डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# युवकांनी आपल्यातील कला-गुणांचा विकास करुन गावाचे नाव उज्वल करावे

## सुभाष लांडगे यांचे प्रतिपादन; कळंब येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

नगर - डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे कार्य आणि विचार आपणा सर्वांना आजही मार्गदर्शक असेच आहे. आज गावातील अनेकजण नोकरी-व्यवसायानिमित्त शहरात गेले आहेत, परंतु त्यांची गावाशी नाळ कायम आहे. गावातील प्रत्येक उत्साहातील त्यांचा सहभाग आणि सहकार्याने मोठ्या प्रमाणात साजरा होतो. सिने अभिनेते गणेश वाघमारे यांनी आपल्या कलाने नाट्य-सिनेसृष्टीत जे स्थान मिळविले, त्याचा गावाला अभिमान आहे. नवयुवकांनी आपल्यातील कला-गुणांचा विकास करुन गावाचे नाव उज्वल करावे, असे आवाहन पोलिस पाटील सुभाष लांडगे यांनी केले.



कळंब येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने नाट्य व सिनेसृष्टीतील योगदानाबद्दल गणेश वाघमारे यांचा 'सन्मानपत्र' देऊन गौरव करण्यात आला.

अकोले तालुक्यातील कळंब येथे आदर्श गौतम सामाजिक तरुण मंडळ व ग्रामस्थांच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्यावतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सिनेअभिनेते गणेश कृष्णाजी वाघमारे होते. कार्यक्रमास पोलिस पाटील सुभाष लांडगे, संतोष खरात, भरत जाधव, मनोज खरात, दिपक देठे आदि उपस्थित होते. सरपंच उत्तम लांडगे, उपसरपंच शकुंतलाबाई खरात, सदस्य भाऊसाहेब भोर यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी बौद्धाचार्य भाऊसाहेब देठे व शांताराम देठे यांनी बुद्धवंना केली. त्यानंतर महिला मेळावा झाला. शिवकृपा हॉस्पिटलच्यावतीने उपस्थितांची मोफत आरोग्य तपासणी करुन उपचार करण्यात आले. सायंकाळी महापुरुषांच्या प्रतिमांची गावातून वाजत-गाजत मिरवणुक काढण्यात आली. यानंतर पाहुण्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी नाट्य व सिनेसृष्टीतील योगदानाबद्दल गणेश वाघमारे यांचा 'सन्मानपत्र' देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी तंटामुक्ती अध्यक्ष गुलबराव जाधव, ग्रा.पं.सदस्या शोभाताई गायकर, सोसायटीचे चेअरमन बबू भोर, सचिव बाळू देठे, यशोमंदिर पतसंस्थेचे संचालक शिवाजी गवांदे (मुंबई), संतोष मदने, बाळासाहेब देठे आदि उपस्थित होते.

प्रास्ताविक किरण देठे यांनी केले तर सूत्रसंचालन संदिप देठे यांनी केले. बाळासाहेब रामचंद्र देठे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुभाष देठे, सुनिल खरात, गणेश गोंदके, विनोद वाघमारे, शांताराम देठे, जयकिसन देठे, दिगंबर देठे, शरद टपाल, प्रकाश देठे आदिंसह समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शहरात दिव्यांगासाठी शाळापूर्व वर्गास प्रारंभ

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठीचा प्रयत्न

नगर - महानगरपालिका शिक्षण विभाग समग्र शिक्षा अभियान समावेशित शिक्षण अंतर्गत बालसुधारगृहाच्या केंद्रात शाळा पूर्व वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या वर्गाद्वारे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेरचे प्राचार्य राजेंद्र बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर शहरामध्ये हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक कौशल्यावर विशेष लक्ष देऊन विद्यार्थ्यां ची सद्यस्थिती लक्षात घेत त्याचे उद्दिष्ट ठरविण्यात येईल व त्यानुसार विद्यार्थ्यांना अध्यापन सहाय्य आणि पालक समुपदेशन केले जाणार असल्याचे केंद्राचे विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी सांगितले.



मनपा शिक्षण विभाग समग्र शिक्षा अभियान समावेशित शिक्षणअंतर्गत बालसुधारगृहाच्या केंद्रात शाळा पूर्व वर्ग सुरु करून दिव्यांगांना शिक्षण देताना प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, महेश क्षीरसागर, शरद पवार, शशिकांत गिते.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण असून, दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी फायदेशीर असल्याचे मनपा शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी सांगितले. या उपक्रमासाठी समन्वयक महेश क्षीरसागर, विशेष तज्ञ शरद पवार, शशिकांत गीते यांचे सहकार्य लाभले.



गोंडेगाव (ता.नेवासा) येथे तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त समाजसेवक जालिंदर बोरुडे यांना जनकल्याण फौंडेशनचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करताना समाजसेवक डॉ. बाबा अरगडे. समवेत साहित्यिक सुनील गोसावी, प्राचार्य बी. पी. ढाकणे, सुभाष सोनवणे आदी.

# जालिंदर बोरुडे यांचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्काराने गौरव

नगर - आर्थिक दुर्बल घटकातील दृष्टीदोष असलेल्या नागरिकांना मोफत शिबिराच्या माध्यमातून नवदृष्टी देण्याचे काम करणारे फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांना जनकल्याण फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

गोंडेगाव (ता. नेवासा) येथे तुकडोजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ समाजसेवक कॉ. बाबा आरगडे यांच्या हस्ते बोरुडे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक सुनिल गोसावी, प्राचार्य बी.पी. ढाकणे, निवृत्त पोलीस अधिकारी तथा कवी सुभाष सोनवणे, डॉ. अशोकराव ढगे, कवी भारत गाडेकर, प्राचार्य किशोर धनवटे, डॉ. अशोक ढगे, जनकल्याण फाऊंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे आदी उपस्थित होते.

जालिंदर बोरुडे फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या ३१ वर्षापासून शिबिर घेऊन हजारो गोरगरीब नेत्रदोष असलेल्या रुग्णांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया घडवून आणल्या असून, या सेवेच्या माध्यमातून अनेकांना नवदृष्टी मिळाली आहे. तर नागरिकांना मरणोत्तर नेत्रदानासाठी प्रोत्साहित करुन अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आणले आहे. नेत्र शिबिराबरोबरच समाजाची गरज ओळखून विविध आरोग्य शिबिर फाऊंडेशनच्या माध्यमातून ते घेत आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जनकल्याण फाऊंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे, सुनिल गोसावी, कवी सुभाष सोनवणे व प्राचार्य ढाकणे यांनी आपल्या मनोगतामध्ये फिनिक्स फाऊंडेशनच्या माध्यमातून बोरुडे यांनी केलेल्या कार्याचे कौतुक केले.

# वर्धापन दिन आणि अक्षय्य तृतीयेनिमित्त 'ए.एच. पोखरणा ज्वेलर्स' मध्ये खास ऑफर

## दागिन्यांच्या मजुरीवर १० ते १०० टक्क्यांपर्यंत सवलत, प्रत्येक खरेदीवर आकर्षक गिफ्ट

नगर - अक्षय्य तृतीयेचा मुहूर्त आणि नवीपेठ दालनाच्या वर्धापन दिनानिमित्त ए.एच.पोखरणा ज्वेलर्सच्या सर्जेपुरा आणि नवीपेठ या दोन्ही दालनात खास ऑफर देण्यात आली आहे. यात ग्राहकांना दागिन्यांच्या मजुरीवर १० ते १०० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक खरेदीवर आकर्षक गिफ्ट दिले जाणार आहे. डायमंड दागिन्यांच्या मजुरीवर सरसकट १०० टक्के सवलत देण्यात येणार आहे, अशी माहिती अमित पोखरणा व आकाश पोखरणा यांनी दिली.



अमित पोखरणा आकाश पोखरणा

तब्बल १७ वर्षांची सुवर्ण सेवेची परंपरा असलेले ए.एच. पोखरणा ज्वेलर्स सुवर्ण दालन नेहमीच ग्राहकांचा प्रेम व विश्वास याला महत्त्व देते. नवीपेठेनंतर खास ग्राहकांच्या सोयीसाठी सर्जेपुरा येथे भव्यदिव्य प्रशस्त दालन सुरू करण्यात आले. या दालनाला ग्राहकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. खरेदीचा चांगला आनंद मिळावा यासाठी मजुरीवर १० ते १०० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार आहे.

पोखरणा ज्वेलर्स हॉलमार्क प्रमाणित दागिन्यांसाठी तसेच सर्वात कमी मजुरी दरासाठी परिचित आहे. सोने (दागिने) मोडताना कुठल्याही प्रकारची घट कापली जात नाही. या जोडीलाच आता अधिक लाभाची योजना प्रत्येक ग्राहकासाठी सुवर्णसंधी ठरेल. पोखरणा ज्वेलर्समध्ये पारंपरिक व अत्याधुनिक ज्वेलरीची मोठी व्हरायटी उपलब्ध आहे. यात डायमंड ज्वेलरी, टेंपल ज्वेलरीसह मंगळसूत्र, नेकलेस, राणीहार, बांगड्या, कर्णफुले, बाजूबंद, सोन्याचे घड्याळ, चेन, ब्रासलेट, अंगठी, तुशी, डायमंड नेकलेस, अँटीक ज्वेलरीची व्हरायटी येथे आहे. महिलांना चोखंदळपणे त्यांच्या मनातील डिझाईनचे सुवर्ण अलंकार याठिकाणी निश्चितच मिळतात. ५ ग्रॅमपासून ते १५० ग्रॅमपर्यंत वजनाच्या दागिन्यांची रेंज येथे आहे. दागिने तसेच हिर्यांची अत्युच्च गुणवत्ता याठिकाणी ग्राहकांना मिळते. चांदीचे पैंजण तसेच अन्य दागिने, भेट वस्तू, देवीदेवतांच्या मूर्ती, पूजा साहित्य, चांदीची नाणी दालनात आहेत

याशिवाय सुवर्ण समृद्धी योजने अंतर्गत १२ हप्ते भरल्यास १३ वा हप्ता मोफत दिला जाणार आहे. ९९.५० शुद्धतेचे सोन्याचे नाणे व वेढणी उपलब्ध आहे. योजनेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ज्वेलर्सच्यावतीने करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेच्या उपजिल्हाध्यक्षपदी भागचंद आव्हाड

पाथर्डी - नगर शहरातील रामभक्त अशी ओळख असलेले भागचंद आव्हाड यांची महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेच्या उपजिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

निवडीचे पत्र जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी अहिल्यानगर येथे दिले. नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, राज ठाकरे यांच्या आदेशाने व प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली आज पर्यंत आपण केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन आपली ही नियुक्ती करण्यात येत आहे.

यावेळी भागचंद आव्हाड म्हणाले की, पक्षाने व जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे त्याला मी कधीही तडा जाऊ देणार नाही राज ठाकरे यांना अभिमान वाटेल असे काम पक्षाच्या माध्यमातून मी करून दाखवीन.

यावेळी पाथर्डी मनसे तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, शहराध्यक्ष संदीप काकडे, शहर उपाध्यक्ष सोमनाथ फासे उपस्थित होते. या निवडीबद्दल भागचंद आव्हाड यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



मनसे शेतकरी सेनेच्या उपजिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याचे पत्र भागचंद आव्हाड यांना देताना जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे. समवेत संतोष जिरेसाळ, संदीप काकडे, सोमनाथ फासे.



जागतिक आरोग्य संघटनेअंतर्गत आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटरमध्ये जागतिक हात स्वच्छता दिनाचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना डॉ. वसंत कटारिया. समवेत डॉ. वैभवी वंजारे, डॉ. नरेंद्र पाटील, डॉ. आशिष भंडारी आदी तसेच नर्सिंग कॉलेजच्या उपमुख्याध्यापिका एस्थेर तेलधुणे आदी स्वच्छतेचे महत्व सांगताना.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये जागतिक हात स्वच्छता दिन साजरा

नगर - जागतिक आरोग्य संघटनेअंतर्गत आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर येथे ७ मे रोजी जागतिक हात स्वच्छता दिन साजरा करण्यात आला. यावर्षी या दिनानिमित्त पॉवर ऑफ हॅण्ड हायजीन ही घोषणा देण्यात आली होती. यानिमित्त घेण्यात आलेल्या स्पर्धेत हॉस्पिटलमधील सर्व नर्सेसनी सहभाग घेतला. यात सीव्हीटीएस ओटी प्रथम, आयसीयु ३ व एनआयसीयूला व्दितीय तर कॅथलॅबला तृतीय क्रमांक मिळाला. कार्यक्रमास डॉ.वसंत कटारिया, डॉ.वैभवी वंजारे, डॉ.नरेंद्र पाटील, डॉ. आशिष भंडारी, स्वप्नील मिरपगार, अर्चना बुट्टे, स्मिता रूपवते आदींसह स्टाफ, रुग्ण व नातेवाईक उपस्थित होते.

मायक्रोबायोलॉजीस्ट डॉ.नरेंद्र पाटील म्हणाले, हाताची स्वच्छता ही पुरातन काळापासून चालत आलेली संस्कृती आहे. तिचे पालन केल्यास आपण अनेक रोगांपासून दूर राहू शकतो. दवाखान्यात काम करीत असलेल्या रूग्णालयीन कर्मचाऱ्यांनी हाताची स्वच्छता व्यवस्थित केल्यास जंतू संसर्ग रोखून रूग्णालाही लवकरात लवकर आराम मिळून डिस्चार्ज मिळू शकतो. नर्सिंग कॉलेजच्या उपमुख्याध्यापिका एस्थेर तेलधुणे यांनी हात स्वच्छतेचे महत्व सांगून जागतिक आरोग्य संघटनेच्या जगभरातील सर्व्हेची माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.वसंत कटारिया यांनी रूग्णाचे आरोग्य सुधारण्यासाठी मेडिसीन आणि स्वच्छता दोन्हीचीही तितकीच गरज असल्याचे सांगितले. डॉ.आशिष भंडारी यांनी सांगितले, २००९ पासून हात स्वच्छता दिनाला महत्व आले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल एनएबीएच मानांकित आहे. ६५१ गोष्टींवर काम करताना जागतिक आरोग्य संघटना व सीडीसी निर्देशानुसार हॉस्पिटल इन्फेक्शन कंट्रोल प्रोग्राम राबवित आहे. यात हॉस्पिटलची स्वच्छता, निर्जतुकीकरण, पेस्ट कंट्रोल यावर भर दिला जात आहे. हाताची स्वच्छता हा महत्वाचा घटक आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल दरवर्षी आपल्या बजेटमध्ये इन्फेक्शन कंट्रोलसाठी १२ ते १५ लाख रुपये खर्च करते. त्यामुळे रूग्णाचा हॉस्पिटलमध्ये दाखल राहण्याचा कालावधी कमी होवून तो लवकर बरा होवून घरी परततो. सूत्रसंचालन स्वाती सूर्यवंशी यांनी केले.

## केडगावमधील श्री गुरूदेव दत्त सेवा ट्रस्टच्या वतीने

# श्री दत्त मंदिराच्या वर्धापनदिनानिमित्त उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा सन्मान

नगर - केडगावमधील सरोदेनगर येथील श्री गुरुदेव दत्त सेवा ट्रस्टच्या वतीने श्री दत्त मंदिराचा द्वितीय वर्धापनदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तिंना गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.



केडगावमधील सरोदेनगर येथील श्री गुरुदेव दत्त सेवा ट्रस्टतर्फे श्री दत्त मंदिराच्या द्वितीय वर्धापनदिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या बाबासाहेब वायकर, दिनेश तांबे, प्रवीण मतकर, डॉ. वनिता शिंदे आदींना ट्रस्टचे अध्यक्ष महेश सरोदे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

यावेळी संगणकीय प्रशिक्षक, शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल गिगाबाईट कॉम्प्युटरचे संचालक बाबासाहेब वायकर, भारतीय नौसेनेत देशाचे रक्षण करणारे दिनेश तांबे, नवनियुक्त पीएसआय प्रवीण मतकर, चैतन्यनाथ हॉस्पिटलच्या संचालिका व मूळव्याध, भंगदरच्या तज्ज्ञ डॉ. वनिता शिंदे आदींना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष व उद्योजक महेश सरोदे यांनी सांगितले.

कै. सुरेखा पोपट सरोदे यांच्या स्मरणार्थ सरोदे कुटुंबीयांनी अरणगाव-केडगाव रोडवर दूध सागर परिसरातील सरोदे नगर येथे स्वखर्चाने श्री दत्त मंदिर उभारून परिसराची शोभा वाढवली आहे. मागील दोन वर्षापासून मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम संपनन होत आहेत. वृद्ध, माता, भगिनी व युवक भक्तिमय वातावरणामुळे आनंदी आहेत.

भक्तीमय वातावरणामध्ये चिंबून जात असतो. त्यामुळे केडगावकर सरोदे कुटुंबियांप्रती संदीप उद्योग समुहाचे संचालक सचिन (आबा) कोतकर यांनी आभार व्यक्त केले.

याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष महेश सरोदे, योगेश सरोदे, सागर कराळे, गोरख हुलगे, बाप्पू कोतकर, अतुल कोतकर, अभिनव लोंढे, राम सरोदे, राजू हुलगे, अजित ठुबे, भारत ठुबे, पांडुरंग कोतकर, ओंकार वारकर, योगेश जाधव, आकाश जरे, दत्ता भगत, आकाश सहाणे, राहुल कोतकर, तसेच परिसरातील महिला देखील उपस्थित होत्या. मंदिराचे पुजारी शुभम पावसे (देवा) यांनी आभार मानले.

# कल्याण रोड येथील गणेश नगर येथे श्री पावन म्हसोबा यात्रेनिमित्त भंडारा

नगर - कल्याण रोड गणेशनगर येथे श्री पावन म्हसोबा उत्सव समितीच्या वतीने व श्री पावन म्हसोबा यात्रोत्सव ८ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली आहे. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत आहे. श्री पावन म्हसोबा उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.



सकाळी ७ वा. श्रीं ची अभिषेक महापुजा करण्यात आली. सकाळी ८ वा श्रींची सवाद्य आरती करण्यात आली. दुपारी - ४ ते ६ वाजता देवाची अलंकार महापूजा करण्यात येणार आहे. तसेच संध्याकाळी ७ वाजता महाआरती करण्यात येईल. महाआरती नंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप (भंडारा) करण्यात येणार आहे.

सर्व भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री पावन म्हसोबा मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मार्कंडेय मंदिर सभामंडप भूमिपूजन कार्यक्रमास प्रारंभ

नगर - पदमशाली पंच कमिटी ज्ञाती समाज, श्री मार्कंडेय देवस्थान ट्रस्ट व समस्त पद्मशाली समाजाच्या वतीने ८,९ व १० मे रोजी होणाऱ्या मार्कण्डेय मंदिर सभामंडप भूमिपूजन कार्यक्रमास सुरुवात झाली असून जास्तीत जास्त संख्येने समाज बांधव व भाविक भक्तांनी तीनही दिवस कार्यक्रमास उपस्थीत राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त पदमशाली समाजाच्या वतीने आवाहन केले आहे.



श्री मार्कंडेय मंदिर सभामंडपाचे भूमिपूजन करताना दाम्पत्य. समवेत समाजबांधव व भाविक भक्त दिसत आहेत.

अत्यंत भक्तिमय वातावरणामधे कार्यक्रमास सुरुवात झाली असून मंदिरा बाहेर मोठे सभा मंडप थाटण्यात आले असून मंदिराचे बाहेरील बाजूस व आतील बाजूस सुंदरपणे विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिराचा आतील बाजूने व श्री मार्कण्डेय महामुनीना सुगंधित फुलांनी सजविण्यात आले आहे. भूमिपूजन समारंभ संत महामुनिच्या हस्ते होणार असल्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे.

८ मे रोजी सकाळी गणेश पूजन, श्री मार्कण्डेय महारुद्राभिषेक, सायंकाळी ७ वा. भजन संध्या व महाप्रसाद ९ मे रोजी होम हवन, पूजाविधी सायंकाळी ७ वा. श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट प्रस्तुत हनुमान चालीसा व त्यानंतर महाप्रसाद व १० मे रोजी सकाळी ९ वा. श्री मार्कंडेय मंदिर सभामंडप भूमिपूजन समारंभ ह. भ. प. श्री जंगले महराज शास्त्री, डोंगरगण, दिग्वजयनाथ महाराज, आळंदी व संगमनाथ महाराज, श्री विशाल गणेश मंदिर यांच्या हस्ते व प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती समाजाच्या वतीने दिली असून या कार्यक्रमास भाविक भक्तांनी उपस्थित राहण्याचे आवाहन समस्त पदमशाली समाजाच्या वतीने केले आहे.



अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये सॉफ्टस्किल डेव्हलपमेंट कार्यशाळेत प्रा. गिरीष कुकरेजा यांनी मार्दर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. योगेश बाफना, उपप्राचार्य वर्षाराणी आव्हाड व विद्यार्थी. (छाया – सागर इंगळे)

# विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासावर भर द्यावा

## प्रा. गिरीष कुकरेजा यांचे प्रतिपादन; 'जीवन कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासा'वर कार्यशाळा

नगर – विद्यर्थ्यांनी शिक्षण घेत असताना बोलण्याचे कौशल्य, महाविद्यालयाच्या विविध उपक्रमात, स्पर्धेत भाग घेणे, सकारात्मक ऊर्जा देणारी पुस्तके वाचणे, मोबाईलचा अति वापर टाळणे, मुलाखतीकरिता आवश्यक असलेल्या सवयी अंगीकारणे, स्वयंशिस्त विद्यार्थ्यांनी लावून घ्यावी. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी उज्वल भविष्यासाठी भाषा कौशल्य, मुलाखतीची तयारी, टीम बिल्डिंग व मॅनेजमेंट. सकारात्मक विचार या विषयांवर प्रा. गिरीष कुकरेजा यांनी मार्गदर्शन केले.

रेज फाउंडेशन संचलित अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी अहमदनगर येथे सॉफ्टस्किल डेव्हलपमेंट कार्यशाळा विद्यार्थ्यांकरिता आयोजित केली होती. या कार्यशाळेत प्रा. गिरीष कुकरेजा यांनी मार्दर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. योगेश बाफना, उपप्राचार्य वर्षाराणी आव्हाड, प्रा.अश्विनी गुंजाळ, प्रा.स्नेहा कणसे, प्रा.पियूष जंगम, प्रा.नयन वारकड, प्रा. भाग्यश्री रांधवण, प्रा.स्नेहल फंड व प्रा. स्वप्नील काळे हे सर्व उपस्थित होते.

आकर्षक चर्चा आणि हँड–ऑन क्टिव्हिटींद्वारे, विद्यार्थ्यांना नोकरीच्या मुलाखतींच्या गुंतागुंतींवर नेव्हिगेट करण्यासाठी, त्यांचे विचार प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि विविध परिस्थितींमध्ये तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक साधनांनी सुसज्ज केले गेले. प्रा. गिरीश कुकरेजा यांचे कौशल्य आणि मार्गदर्शन विद्यार्थ्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाकडे सर्वांगीण दृष्टीकोन विकसित करण्यात मदत करणारे ठरले. यावेळी डॉ. योगेश बाफना म्हणाले, या कार्यशाळेचा विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील कार्यकाळात मोठा उपयोग होणार आहे.

# अहमदनगर सीए शाखेचे विविध कार्य कौतुकास्पद

## सीए रणजीतकुमार आगरवाल यांचे प्रतिपादन; आयसीएआयचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपाध्यक्षांची अहमदनगर सीए शाखेला सदिच्छा भेट

नगर – आयसीएआयचे राष्ट्रीय अध्यक्ष सीए रणजीत कुमार आगरवाल आणि उपाध्यक्ष सीए चरणजोत सिंह नंदा यांनी नुकतीच अहमदनगर शाखेला भेट दिली. या प्रसंगी त्यांचे पोलिस बँड पथकातर्फे स्वागत करण्यात आले.

अध्यक्ष सीए रणजीत कुमार आगरवाल यांनी नगर शाखेचे गौरव केला. देशातील ही पहिली शाखा आहे जी गेली २२ वर्षांपासून अनऑडिटेड बॅलेन्स शीट ३१ मार्च रोजी आणि ऑडिटेड १ एप्रिल रोजी प्रस्तुत करते, तसेच, नगर शाखेचे अध्यक्ष व इतर सर्व टिम उत्कृष्ट कार्य करीत आहे.



सीए बेनोवेलंट निधीसाठी नगर शाखेच्यावतीने १ लाख ११ हजार १११ रुपयांचे सहाय्य आयसीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष सीए रणजीतकुमार अगरवाल यांच्याकडे सुपुर्द करताना अध्यक्ष सीए सनित मुथा. समवेत सीए नगर शाखेचे पदाधिकारी व सदस्य.

येत्या वर्षासाठी राष्ट्रीय अध्यक्ष त्याचे दृष्टी या उपक्रमात संकलित केले आहे, ज्याचा अर्थ 'दृष्टी' आहे आणि ज्याद्वारे या संस्थेला डिजिटलायझेशन (डी), रिसर्च (आर), इंटीग्रिटी (आय), स्किल (एस), हॅण्ड होल्डिंग (एच), ट्रांस्परन्सी (टी) इंडिपेंडेंस (आय) या क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी प्रगती करण्यास मदत होईल. तसेच, संपूर्ण देशात सध्या ४ लाख सीए असून ९ लाखा विद्यार्थी आहेत, २०४७ पर्यंत ३० लाख सीए व्हायला पाहिजेत असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी उपाध्यक्ष सीए चरणजोत सिंह नंदा यांनी बोलताना सीए इन्स्टिट्यूटचे महत्व संगितले. सीएंना त्यांनी आर्थिक सोल्जर म्हणून संबोधले. तसेच भारतीय सीए जागतिक स्तरावर ओळखले जातात.

बोर्ड ऑफ स्टडीजचे अध्यक्ष सीए, डॉ. राजकुमार अडुकीआ आणि सीसीएम सीए उमेश शर्मा, डब्ल्यूआयआरसीचे माजी अध्यक्ष सीए अर्पित काबरा आणि डब्ल्यूआयआरसी चे विकासा अध्यक्ष सीए पीयूष चांडक हे सुद्धा उपस्थित होते व त्यांनी ही आपले मनोगत थोडक्यात व्यक्त केले.

नगर शाखेचे अध्यक्ष सीए सनित मुथा यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी बोलताना त्यांनी चार वर्षांच्या दीर्घ प्रतिक्षेनंतर राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपाध्यक्ष सीए यांची भेट अहमदनगर सीए शाखेला लाभली आहे असे संगितले, तसेच, नगर शाखेबद्दल माहिती देऊन या वर्षात होणाऱ्या नवीन उपक्रम जसे नवीन सोलार प्रोजेक्ट, नवीन लायब्ररी, वेग्वेग्ल्य विषयांवर सेमिनार, स्पोर्ट्स इवेंट, यावर्षी आरआरसी तिरुपति येथे घेण्यात आहे याबद्दल माहिती दिली.

सीए बेनोवेलंट निधीसाठी नगर शाखेच्या वतीने १ लाख ११ हजार एकशे अकरा रूपयांची सहायता देण्यात आली. हा धनादेश सीए रणजीत कुमार आगरवाल यांचेकडे सुपूर्द करण्यात आला.

या वेळी माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा, सीए संजय देशमुख, सीए अजय मुथा, सीए मिलिंद जांगडा, सीए सुशील जैन, सीए प्रसाद भंडारी, सीए (डॉ) परेश बोरा, सीए किरण भंडारी, सीए संदीप देसरडा हे उपस्थित होते. सूत्रसंचालन सीए आयूषी कसवा आणि सीए काजल चंदे यांनी केले तर सीए प्रसाद पुराणिक यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सीए सनित मुथा, सीए प्रसाद पुराणिक, सीए अभयकुमार कटारिया, सीए महेश तिवारी, सीए ज्ञानेश्वर काळे, सीए पवनकुमार दरक आणि नगर विद्यार्थी शाखेचे सभासद यांनी परिश्रम घेतले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशीष्टात वर्णन केलेली मिळकत, आमचे अशिल १. श्री गौरव विलास गुगळे, २. गीतांजली योगेश फिरोदिया, ३. ज्योती गौरव गुंदेचा, ४. नूतन संकेत चोपडा. रा. तुकाई दर्शन, लेन नं.१२, सासवड रोड, हडपसर, पुणे. यांची वडीलोपार्जित मिळकत असुन ती त्यांचे नावावर व त्यांचे ताब्यात असुन या बाबतीत दिनांक ३०/०४/२०२४ रोजी नवामराठा न्युज पेपरमध्ये मिळकत विक्री संदर्भा बाबत जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली आहे. या जाहिर नोटीसीमध्ये चुकीची माहिती दिलेली असुन या मिळकतीबाबत तुमचे अशिल चैनसुख श्रीमल गुगळे यांनी सदर मिळकतीबाबत तिऱ्हाईत इसमास बेकायदेशीर रित्या चुकीची व खोटी माहिती देवुन सदर मिळकत विकण्याचा प्रयत्न करत आहेत. सदर या मिळकतीचे वाटप झालेले नाही. त्यामुळे हा व्यवहार बेकायदेशीर ठरवण्यात येईल. सदर मिळकतीचा कोणीही कोणत्याही प्रकारे तिऱ्हाईत इसमाव्दारे व्यवहार करण्याचा प्रयत्न केल्यास अथवा सदर मिळकतीत प्रवेश करुन सदर मिळकतीचा ताबा घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यास दिवाणी व फौजदारी कारवाईस सामोरे जावे लागेल तसेच या मिळकती व्यवहारापोटी कोणाची फसवणुक होउ नये म्हणुन ही जाहिर नोटीस देण्यात येत आहे. तसेच या जाहिर नोटीसची प्रत माहितीसाठी वकिलांना पाठविण्यात आली आहे.

मिळकतीचे वर्णन : मौजे चिंचोडी ता. पाथर्डी जि.अहमदनगर येथील शेतजमीन मिळकत. गट नं. ४६०, क्षेत्र ५हे. १८ आर अधिक ०हे०४ आर एकुण ५हे २२ आर ही मिळकत.

येणेप्रमाणे जाहिर नोटीस असे.

दिनांक : ०८/०५/२०२४

**ॲड. संजय भळगट**
मोरेश्वर अपार्टमेंट, गांधी पेठ, चिंचवड,
पुणे ४११०३३. मो. ९८२२५११८६५


# कामगार दिनानिमित्त उद्यान विभागातील कामगारांचा सन्मान व मतदार जागृती

## हरदिन मॉर्निंग ग्रुपचा उपक्रम, कॉस्ट अ‍ॅण्ड मॅनेजमेंट अकाउंट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या स्नेहा खोत हिचा सत्कार

नगर – कामगार दिनानिमित्त हरदिन मॉर्निंग ग्रुपतर्फे १ मे रोजी भिंगार कॅन्टोन्मेंट मधील उद्यान विभागातील कामगारांचा सन्मान करण्यात आला. भगवान गौतमबुध्द जॉगींग पार्कमध्ये झालेल्या कार्यक्रमात नागरिकांना कोणत्याही अमिषाला बळी न पडता, निर्भय व धर्मनिरपेक्षपणे मतदान करुन मतदानाचा हक्क बजावण्याचा व लोकशाही सक्षम करण्याची शपथ देण्यात आली.

सीए रवींद्र कटारिया, स्वामी विवेकानंद प्रबोधिनी ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोद मुळे व हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते वर्षभर उद्यानातील झाडांची काळजी घेऊन त्यांचे संवर्धन करणारे कॅन्टोन्मेंट उद्यान विभागातील कामगार बबन वैरागळ, विशाल भामरे, मुरलीधर बरबडे, राहुल भिंगारदिवे यांचा सत्कार करण्यात आला.




कामगार दिनानिमित्त कॅन्टोन्मेंट विभागातील कामगार सन्मान व मतदार जागृती प्रसंगी हरदिन मॉर्निंग ग्रुपतर्फे निर्भयपणे मतदानाचा हक्क बाजवणे व लोकशाही सक्षम करण्याची शपथ देताना सी.ए. रवींद्र कटारिया, प्रमोद मुळे, संजय सपकाळ आदी.

तसेच कॉस्ट अ‍ॅण्ड मॅनेजमेंट अकाउंट (सीएमए) ही प्रोफेशनल परीक्षा उत्तीर्ण होऊन एका नामांकित कंपनीत नियुक्ती झाल्याबद्दल स्नेहा विनोद खोत हिचा विशेष सत्कार करण्यात आला. ईवान सपकाळ व नंदलाल परदेशी यांच्या वाढदिवसानिमित्त उद्यानात वृक्षरोपण करण्यात आले.

यावेळी विनोद खोत, सर्वेश सपकाळ, रमेश वराडे, सुमेश केदारे, दिलीप ठोकळ, दीपक बडदे, जहीर सय्यद, दीपक धाडगे, दिलीप गुगळे, सचिन चोपडा, विठ्ठल राहिंज, अथर्व सपकाळ, बापू तांबे, अभिजीत सपकाळ, शशांक अबनावे, अशोक पराते, किशोर भिंगारकर, सुभाष पेंढूरकर, दिनेश शहापूरकर, नामदेव जावळे, प्रभाकर सपकाळ, प्रांजली सपकाळ, ज्योती झावरे, संगीता सपकाळ, सुनिता खोत, श्रावणी देवगुडे, भार्गवी दातीर, तनिष्का सावळे, लताबाई सपकाळ, सतीश सपकाळ, विलास तोतरे, नितीन पाटोळे, मुन्ना वाघस्कर, राजू कांबळे, अविनाश पोतदार, सुंदरराव पाटील, सरदारसिंह परदेशी, अविनाश जाधव, रवींद्र जाजू, सिताराम परदेशी, अभिजीत सपकाळ, शेषराव पालवे, रमेश कोठारी, सुहास देवराईकर, सुभाष रासने, मंगेश मोकळ, किरण फुलारी, केशव दवणे, दत्तात्रेय लाहुंडे, हरी शेलार, प्रकाश भिंगारदिवे, अनिल ताठे, योगेश चौधरी, गोकुळ भांगे, शेखर चौधरी, नवनाथ डपकर, शशांक अंबावडे, सचिन कस्तुरे, राम झिंजे उपस्थित होते.

सीए रवींद्र कटारिया म्हणाले की, कामगार वर्ग समाजातील वैभव निर्माण करण्याचे व टिकविण्याचे काम करतात. विकासात कामगार वर्गाचा सर्वात मोठा वाटा आहे. पर्यावरण संवर्धनासाठी वर्षभर उद्यानातील झाडांचे पालनपोषण करणाऱ्या कामगारांचा झालेला सन्मान अभिनंदनीय असल्याचे त्यांनी सांगितले.

संजय सपकाळ म्हणाले की, मतदानाने आपले व आपल्या भावी पिढीचे भवितव्य ठरणार आहे. मतदान करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे. आपल्या मतातून लोकशाहीला बळ मिळणार असल्याचे सांगून त्यांनी मतदानाचे कर्तव्य बजावण्याची शपथ दिली.

अरविंद ब्राह्मणे यांनी आपल्या मनोगतामध्ये देशातील कामगार चळवळीचे महत्त्व विशद केले.

प्रमोद मुळे व शिवप्रसाद काळे यांनी ऑनलाईन पध्दतीने मतदार यादीत नाव शोधून कोणत्या बुथवर आपले मतदान असल्याची माहिती मिळविण्याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. सुमेश केदारे यांनी आभार मानले.


## जाहीर नोटीस हरकत

दि. ०८/०५/२०२४

तमाम लोकांस या जाहिर नोटीस हरकतीने कळविण्यात येते की, दि. ०३/०५/२०२४ रोजी **ॲड. संजय बबनराव गायकवाड, अहमदनगर** यांचेमार्फत दै.नवा मराठा या वर्तमानपत्रांमध्ये खालील परिशिष्ठामध्ये नमुद केलेली मिळकतीबाबत मच्छिंद्र भानुदास बेरड व एकनाथ ठकाजी ससे यांची जाहिर नोटीस प्रसिध्द करून इतर कोणीही व्यवहार करु नये अशी जाहिर नोटीस देण्यात आली होती, सदरील नोटीस बेकायदेशीर आहे.

सदरील जाहिर नोटीसीस आमचे अशिल नामे श्रीमती स्नेहल विष्णु मोहिते रा. कुकाणा, ता. नेवासा, जि. अहमदनगर यांची खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकतीमध्ये कायदेशीर हितसंबंध गुंतलेले आहेत.

खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकतीला लागुनच आमचे अशिलांची दरेवाडी येथील गट नं.७७ मध्ये ०० हे. ८४ आर अशी शेत मिळकत आहे. परंतू सदर जाहिर नोटीसीमधील मिळकतीबाबत झालेले बिनकब्जाचे साठेखत व त्याबाबत भविष्यात होणारे हस्तांतर यामुळे आमचे अशिलांचे हितसंबंधास बाधा निर्माण होत आहे. सदर नोटीसमधील मिळकत ही आमचे अशिलास विकत घेण्याचा हक्क व अधिकार आहे. प्रसिध्द झालेल्या नोटीसीमध्ये हस्तांतराबाबत महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ या कायदयाचा बाध आहे व अशा व्यवहारास कायदयाने बंदी आहे.

तरी या नोटीस उत्तराने तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री. नवनाथ बाजीराव मोहिते यांनी मच्छिंद्र भानुदास बेरड व एकनाथ ठकाजी ससे यांना दिनांक ३०/११/२०२३ रोजी रजि. दस्त नं. १०३१६ / २०२३ विनाकब्जाचे साठेखत दिले त्याअन्वये दरेवाडी येथील गट नं. ८५/२ मधील ००हे. ११ आर या मिळकतीचे कोणीही हस्तांतरणाचा व्यवहार करु नये. सदर मिळकत ही आमचे अशिल कायदेशीर किंमत तुमचेपैकी नं. ३ यांना देऊन कायदेशीर विकत घेण्यास तयार आहे. याउपर कोणीही परस्पर सदर मिळकतीचे हस्तांतर केल्यास आमचे अशिल त्यास जबाबदार राहणार नाहीत व आमचे अशिल हस्तांतरणाचा व्यवहार करणाऱ्याविरुध्द पुढील कायदेशीर कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन:-**

जिल्हा अहमदनगर तालुका नगर पैकी मौजे **दरेवाडी ग्रामपंचायत हद्दितील** मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

दरेवाडी ता. जि. अहमदनगर येथील सर्व्हे नं. ८५ / २ या मिळकतीपैकी ०० हे. ११ आर **यासी चतु:सिमा सरकारी रेकॉर्डप्रमाणे.**

येणे प्रमाणे चतुः सिमापूर्वक मिळकत यामध्ये दगड माती, झाड झुडुप जाण्या येण्याच्या हक्कासह व तदंगभुत वस्तुसह खाली काही एक राखुन न ठेवता.

येणे प्रमाणे जाहिर नोटीसीस उत्तर / हरकत दि. ०८/०५/२०२४ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

**ॲड. आर. पी. सुपेकर**
मो. न. ९८५०७९२५१५
ऑफिस: चेंबर्स नं. २०८, अहमदनगर जिल्हा न्यायालय
आवार, अहमदनगर ४१४००१.


# महाराष्ट्र दिननिमित्त एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्यावतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया व नेत्र तपासणी शिबिरास प्रतिसाद

नगर– सरदार पटेल कार्यालय, टिळक रोड येथे महाराष्ट्र दिनानिमित्त एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्यावतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच नेत्र तपासणी शिबिरास रुग्णांनी प्रतिसाद दिला.

शिबिरामध्ये २४८ रुग्णांचे नेत्र तपासणी करून ४० रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी पुणे येथील नेत्र रुग्णालयात रवाना करण्यात येणार असून तसेच ८० गरजू रुग्णांना चष्मे वाटप करण्यात आले.

यावेळी एच. व्ही. देसाई रुग्णालयाचे इन्चार्ज शुभम बोज्ञा म्हणाले, आज संगणक, टीव्ही व प्रदुषणमुळे डोळ्यांवर व आरोग्यावर दुष्परिणाम होऊ लागले आहेत. काही शहरी व ग्रामीण भागात डोळ्यांची व आरोग्याची निगा राखण्यामध्ये जनतेचे दुर्लक्ष होत चालले आहे. त्यातच मोतीबिंदूसारख्या सुमारे १० ते १२ हजार रुपयांच्या शस्त्रक्रिया सामान्यांच्या आवाक्याबाहेरच्या असतात. म्हणून महाराष्ट्र दिनानिमित्ताने मोफतशिबीर आयोजित केल्याचे सांगून वर्षभर मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर नेत्र रुणाच्यावतीने करण्यात येते तरी या रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रिया करायचे असेल त्यांनी स्वामी समर्थ मंदिरामागे, हॉटेल ओबेरॉय समोर, नगर–शिर्डी रोड, सावेडी, अहमदनगर येथे संपर्क साधावा, असे आव्हान त्यांनी यावेळी केले. या नेत्र शिबिरात डॉक्टर आनंद बोज्ञा रुग्णांची तपासणी करून योग्य ते मार्गदर्शन केले.



महाराष्ट्र दिनानिमित्त एच. व्ही. देसाई रुग्णालयाच्यावतीने मोफत मोतीबिंदू व नेत्रतपासणी शिबिरात रुग्णांची तपासणी करताना डॉ. आनंद बोज्ञा, शुभम बोज्ञा.

# साईबाबांच्या शिर्डीत श्रद्धा सबुरीबरोबरच प्रामाणिक कर्मचाऱ्यांवर भक्तांचा विश्वास सार्थ

## साई संस्थांच्या बसमध्ये विसरुन राहिलेला ऐवज साळूंके यांनी केला परत

नगर – भक्त आणि भगवंत यांचं नात अतुट असते. साईंच्या दरबारात येणारे भक्त मोठ्या श्रद्धेने त्यांच्या चरणी लीन होत असतात. शिर्डीत आलेले भाविक साई बाबांच्या दर्शनाने धन्य होतात. अशावेळी आपल्या जवळ असलेल्या किंमती वस्तू, बॅग, कुठं, कशा विसरतात ते कळत देखील नाही.

साईबाबांच्या शिर्डीत श्रद्धा–सबुरी बरोबरच या संस्थेत काम करणाऱ्या प्रामाणिक कर्मचाऱ्यांवरील भक्तांचा विश्वास सार्थ ठरवत आहेत. मंगळवारी दुपारी गोरेगांव (पारनेर) येथील नरसाळे परिवार बाबांचे दर्शन घेतल्यावर प्रसाद घेण्यासाठी साईरथ या बसमध्ये प्रवास करताना सिट खाली पर्स पडली. दोन तास झाले तरी ही गोष्ट भक्ताच्या लक्षात आली नाही. प्रसाद घेऊन येतांना त्याच बसमध्ये परत बसले (एमएच १७ बीवाय २२६५) या बसचा चालक रविंद्र पाराजी साळूंके हा कंत्राटी वाहन चालक आधारकार्ड वरील मोबाईल नंबरने संपर्क करीत असतांना त्याच बसमध्ये प्रवास करणाऱ्यां अमृता नरसाळे यांना संपर्क झाला व पर्सबद्दल माहिती दिली. पर्समध्ये असलेल्या महत्वाच्या कागदपत्रांवरुन, फोटो, रोख रक्कम, असा ऐवज ओळख पटवून सदर चालक साळूंके यांनी नरसाळे परिवाराला परत दिला.



शिर्डी संस्थांचे वाहन चालक रविंद्र साळूंके यांनी बसमध्ये विसरलेली पर्स गोरेगाव (पारनेर) येथील भक्त अमृता नरसाळे यांना परत केली. समवेत अमोल नरसाळे, अनिता मते आदी. त्यांच्या कार्याबद्दल या वेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्य.अधिकारी तुकाराम हुलवळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (छाया – विजय मते)

याबाबत श्री. साळूंके यांचे प्रामाणिकपणाबद्दल आभार मानले. जर संपर्क करता झाला नसता तर तुम्ही काय केले असते असे विचारले असता ते म्हणाले, बाबांच्या दर्शनाला आलेले भक्त आर्शिवाद घेऊन तृप्त होतात. मन भारावून जातात, अशा या आनंदात ते बसमध्ये बॅग, पर्स, काही ना काही वस्तू विसरतात. ४ दिवसांपूर्वी हैद्राबाद येथील एका महिला भक्ताची बॅग विसरली होती त्यामध्ये सोने, रोख रक्कम असा साडेचार ते पाच लाखांचा ऐवज सापडला होता. ओळख पटवून तो परत दिला. मला पाच हजार रुपये रोख बक्षीस देत होत्या. मी ते न घेता बाबांच्या पेटीत टाका ही त्यांची सेवा आहे. मी वाहन चालक म्हणून माझे काम चोख करतो. प्रवासी उतरले की लगेच बस चेक करतो. काही जरी सापडले तर संपर्क साधता आला तर ते परत करतो, नाही संपर्क झाला तर संस्थानच्या ऑफिसमध्ये जमा करतो. अशा या प्रामाणिक कर्मचार्यांवर भक्तांचा विश्वास सार्थ होतो.

रविंद्र साळूंके यांच्या प्रामाणिक सेवेबद्दल १ मे रोजी संस्थांतर्फे आदर्श वाहन चालक म्हणून सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्य.अधिकारी तुकाराम हुलवळे, सा.बां. उप कार्य. अधिकारी दिनकर देसाई, भिकण दाभाडे, विठ्ठलराव बर्गे, वाहन विभागप्रमुख अतुल वाघ आदी उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकत विक्रीचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरलेला आहे सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. ०८/०५/२०२४

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

१) मिळकत वर्णन : जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी नगरपैकी, महानगरपालिका हद्दीतील मौजे माळीवाडा येथील सर्व्हे नंबर ४८ / १अ / ४८ / १ब मधील संतोष बाकलीवाल पार्क या रो हाऊस स्कीममधील खालील वर्णनाची मिळकत –

| प्लॉटनंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | यासी चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ३ ते६/६ | ९०.२० | सर्व्हे नंबर ४८/५ | प्लॉट नंबर ७ | ६.०० मी. रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ३ ते ६/५ |
| हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील आर सी सी मधील असलेले ग्राऊंड फ्लोअरचे बांधकाम क्षेत्र ४५.१० चौ.मी व पोर्चचे क्षेत्र २.६४ चौ. मी. असे एकुण क्षेत्र ४७.७४ चौ.मी. लाईट मीटर नळ कनेक्शन व पाण्याच्या बोअरसह हि आहे त्या स्थितीत संपुर्ण मिळकत. याचा रो–हाऊस नंबर ६ असा आहे. | | | | | |

**विद्यमान मालकाचे नांव-**
**सौ. सविता रामकिसन कारखेले**
रा. त्रिभुवनवाडी, ता. पाथर्डी, जि अहमदनगर ४१४१०६.

**ॲड. आर. टी. शर्मा**
फोन नं. २३४११०६, मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस – नं. १४,१७, पहिला मजला,
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहमदनगर


# आनंदी हृदय हेच निरोगी जीवनाचे औषध : प्रकाश थोरात

## एस.डी.ए. मेन चर्च व शांतीपूर चर्चच्या वतीने महाराष्ट्र व कामगार दिनाचा उपक्रम

नगर – आनंदी हृद्य हेच निरोगी जीवनाचे औषध आहे. मानसिक तणाव व चुकीच्या जीवनशैलीमुळे अनेक दुर्धर आजार जडत आहे. यासाठी वेळोवेळी तपासणी महत्त्वाची असून, मोफत शिबिर सर्वसामान्य कामगार वर्गासाठी आधार ठरत असल्याचे प्रकाश थोरात यांनी सांगितले.

महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त सर्वसामान्य कामगार वर्गाची मोफत आनंदी हृद्यरोग तपासणी करण्यात आली. एस.डी.ए. मेन चर्च व शांतीपूर चर्चच्या वतीने शहरातील कोठी येथे हा उपक्रम राबविण्यात आला. या शिबिरास कामगार वर्गाचा प्रतिसाद लाभला.



एस.डी.ए. मेन चर्च व शांतीपूर चर्चच्यावतीने महाराष्ट्र व कामगार दिनी कामगार वर्गासाठी आयोजित आनंदी हृदयरोग तपासणी शिबीराचे उद्घाटन प्रसंगी हेल्पलाईनचे प्रकाश थोरात.

या शिबिराचे उद्घाटन पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. महेश जरे, डॉ. सुदिन जाधव, आधार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संदीप पवार, धर्मगुरु अरुण जगताप, उज्वल कांदणे, सॉलोमन बोरगे, नितीन जगधने, डेव्हिड अवचिते, डॅनियल भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

डॉ. महेश जरे यांनी आजार झाल्यावर अनेक समस्या निर्माण होतात, उपचार घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात असलेला खर्च सर्वसामान्यांच्या अवाक्याबाहेरचा असतो. वेळोवेळी तपासणीने वेळीच आजारापासून मुक्तता मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

अरुण जगताप म्हणाले की, कामगार वर्ग धकाधकीच्या जीवनात स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष देत नाही. सर्वसामान्य कामगार वर्गामध्ये हृद्य विकाराचा झटका येण्याचे प्रमाण दिवसंदिवस वाढत आहे. तणावपूर्ण जीवनशैली, चूकीची आहार पध्दती व व्यायामाच्या अभावामुळे हृद्यरोगाचे प्रमाण वाढत असल्याचे सांगितले.

या शिबिरात रुग्णांची मोफत हृद्यरोग तपासणी करुन त्यांना पुढील उपचारासाठी सवलत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तर हृद्यरोग टाळण्यासाठी तज्ञ डॉक्टरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# कॅलिडोस्कोप



मलाही हवा गारेगार खाऊ
तू एकटाच का ताव मारतोस
आईस्क्रीमवर भाऊ...

## मंदिर उघडतं बारा तासांसाठी...

**भा**रतात अनेक मंदिरं आहेत. बऱ्याच मंदिरांमध्ये अनोख्या परंपरा पहायला मिळतात. काही मंदिरं वर्षातून एकदाच उघडतात तर काही मंदिरांमध्ये वेगळ्या पद्धतीचा नैवेद्य दाखवला जातो. काही मंदिरं चित्रविचित्र नवस बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. छत्तीसगडमधल्या कोंडागाव जिल्ह्यात असंच एक मंदिर आहे. लिंगेश्वरी मातेचं हे मंदिर छत्तीसगडमध्ये असून तिथे त्याला मोठं महत्त्व आहे. ते वर्षातून फक्त एकदाच उघडतं आणि तेही फक्त बारा तासांसाठी. यावेळी इथे भाविकांनी मोठी गर्दी झालेली असते. छत्तीसगडमधला हा जिल्हा नक्षल प्रभावित आहे. त्यामुळे इतर भागातले लोक या ठिकाणी फारसे येत नाहीत. हिरव्यागार जंगलाच्या मधोमध अलोर नावाचं छोटंसं गाव आहे. गावातल्या डोंगरांवर निसर्गाची एक कलाकृती पहायला मिळते. याच कलाकृतीच्या दारावर एक दगड आहे. हा दगड हटवल्यानंतरच मंदिरात प्रवेश करता येतो. या मंदिरात शंकर आणि पार्वतीच्या एकत्र रूपाला 'लिंगेश्वरी' नावाने संबोधलं जातं. या मंदिरातल्या देवतेला काकडीचा नैवेद्य दाखवला की नवस पूर्ण होतो अशी इथल्या लोकांची श्रद्धा आहे. त्यामुळे मंदिराच्या आसपास काकडी मोठ्या प्रमाणावर विकली जाते. लिंगेश्वरी देवतेला काकडी अर्पण केली की अपत्यप्राप्ती होते असंही मानलं जातं. फक्त एकच दिवस मंदिर उघडत असल्याने भाविक रांगत रांगत दर्शनासाठी जातात.



## 'जय रामजी' लिहून विद्यार्थी उत्तीर्ण!

**अ**भ्यासलेल्या विषयातील काही प्रश्न विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेत विचारलेले असतात ज्याचे उत्तर लिहायचे असते. उत्तरपत्रिका तपासणाऱ्यास विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मिळतेजुळते वाटले तर त्याप्रमाणे गुण मिळतात. यावरुन तुम्ही पास की नापास होणार हे ठरते. उत्तर येत नसेल तर काहीतरी लिहून ये असा सल्ला घेऊन आलेले विद्यार्थी उत्तरपत्रिका 'काहीतरी' लिहून भरुन काढतात. आश्चर्य म्हणजे या काहीतरी लिहिण्याचे विद्यार्थ्याला मार्क्स दिले जातात.

उत्तर प्रदेशात एका विद्यापीठात असा प्रकार घडला. एका विद्यार्थ्याने प्रश्नाचे उत्तर लिहिण्याऐवजी 'जय राम जी' आणि क्रिकेटपटूंची नावे लिहिली. मात्र या विद्यार्थ्याला परीक्षेत उत्तीर्ण घोषित करण्यात आल्यानंतर सर्व प्रकार गंभीर बनत केला. जौनपूरच्या वीर बहादूर सिंग पूर्वांचल विद्यापीठाची परीक्षा पार पडली होती. या परीक्षेत प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांकडून लाच घेऊन त्यांना उत्तीर्ण केल्याचा प्रकार समोर आला होता. यानंतर विद्यापीठात शिकणाऱ्या दिव्यांशू सिंग नावाच्या विद्यार्थ्याने ३ ऑगस्ट २०२३ रोजी आरटीआय दाखल केला होता. फार्मसीचे शिक्षण घेत असणाऱ्या प्रथम वर्षाच्या १८ विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांचे पुनर्मूल्यांकन करण्यात यावे, अशी मागणी माहिती अधिकारात करण्यात आली होती. त्यानंतर विद्यापीठ प्रशासनाने चौकशी समिती स्थापन केली. गंभीर बाबीचा तपास करत असताना पेपर तपासणीतील अनियमितता समोर आली. येथील विनय वर्मा आणि आशिष गुप्ता या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना



पास करण्यासाठी पैसे घेतल्याचा आरोप दिव्यांशूने केला होता. त्याने यासंदर्भातील पुरावे सादर केले. त्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या वादग्रस्त उत्तरपत्रिका काटेकोरपणे तपासण्यात आल्या. त्या उत्तरपत्रिकांमध्ये 'जय राम जी' अशा घोषणा आणि रोहित शर्मा, विराट कोहली, हार्दिक पंड्या यांसारख्या क्रिकेटपटूंची नावे लिहिल्याचे समोर आले. प्रश्नाचे उत्तर लिहिण्याऐवजी विद्यार्थ्यांनी भलतेच काहीतरी लिहिले होते. असे असतानाही विद्यार्थ्यांना अपेक्षेपेक्षा जास्त गुण मिळाल्याचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे दोषी प्राध्यापकांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात आली.

## सुंदर, शांत कर्दे बीच!

**र**त्नागिरी जिल्ह्यामधील दापोली किनारपट्टीवर एक प्राचीन आणि शांत समुद्रकिनारा आहे. तो कर्दे बीच म्हणून ओळखला जातो. सोनेरी वाळू, स्वच्छ पाणी आणि सुंदर दृश्य पाहून मन मोहले नाही तर नवल! महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे ठिकाण डॉल्फिन पाहण्यासाठी सर्वोत्तम आहे. डॉल्फिन पाहणे हा एक सुंदर आणि थरारक अनुभव आहे. डॉल्फिन पाहण्यासाठी सर्वोत्तम वेळ म्हणजे सकाळ किंवा संध्याकाळ. या काळात पाणी शांत आणि स्वच्छ असते. या बीचवर बोट राईडची मजाही तुम्ही घेऊ शकता. कर्दे बीचला भेट देण्यासाठी उन्हाळा हा पीक सीझन आहे, कारण बरेच पर्यटक समुद्राचा आनंद घेण्यासाठी बीचवर येतात. या काळामध्ये इथले हवामान उष्ण आणि दमट असते; परंतु समुद्राच्या वाऱ्यामुळे थोडासा दिलासाही मिळतो. इथल्या समुद्रातील पाणी पोहण्यासाठी तसेच वॉटर ॲक्टीव्हिजसाठी उत्तम मानले जाते. इथे या काळात सर्वात जास्त गर्दी असल्यामुळे तुम्हाला निवास आणि वाहतुकीची आगाऊ सोय करावी लागेल.



## किडे... प्लास्टिक खाणारे

**प्ला**स्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत जनजागृती होत असते. अनेक ठिकाणी प्लास्टिकच्या पिशव्या वा अन्य वस्तूंवर बंदी असते. वर्षानुवर्षं प्लास्टिकचं विघटन होत नाही. त्यामुळे ते पर्यावरणाला हानिकारक असतं. पण आता एक किडा प्लास्टिक खाऊन पर्यावरणाचं रक्षण करू शकत असल्याचे समोर आले आहे. मधमाशीचं पोळं खाणारा एक किटक प्लास्टिकही खाऊ शकतो असं केंब्रिज विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. हा किटक मधमाशीचं पोळं पचवू शकतो. त्याचप्रमाणे तो प्लास्टिकही पचवू शकतो, असं संशोधनातून समोर आलं आहे. 'गॅलेरिया मेलोनेला' असं या किटकाचं नाव आहे. तो एखाद्या अळीसारखा दिसतो. हा किडा तासाभरात प्लास्टिकची पिशवी खाऊ शकतो. केंब्रिज विद्यापीठातले डॉक्टर पाओलो बॉम्बेली या संशोधनाचे प्रमुख आहे. प्लास्टिक खाण्याचे किड्याचं तंत्र जाणून घेतलं तर प्लास्टिक नष्ट करण्याचं तंत्रज्ञान आपण निर्माण करू शकू, असे ते म्हणतात. यामुळे प्लास्टिकमुळे होणाऱ्या प्रदुषणाचं आव्हानाला सामोरं जाता येईल, असं त्यांचं म्हणणं आहे. या छोट्याशा किड्यांची प्लास्टिक खाण्याची क्षमता अनोखीच म्हटली पाहिजे.



## निसर्गरम्य विमानतळ



**हे** नेमकं काय आहे, असा प्रश्न तुम्हाला शेजारचा फोटो पाहून पडला असेल. हा रस्ता वाटतोय. पण प्रत्यक्षात हा विमानतळाचा रन वे आहे. विशेष म्हणजे अत्यंत सुंदर असं हे विमानतळ भारतात आहे. त्यातही ते भारत–चीन सीमेपासून अवघ्या ६० किलोमीटर अंतरावर आहे. पाकयोंग असं या विमानतळाचं नाव आहे. सिक्किममधलं हे पहिलंच विमानतळ आहे तर भारतातलं हे शंभरावं विमानतळ आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या विमानतळाचं उद्घाटन केलं होतं. निसर्गरम्य अशा वातावरणात हे विमानतळ वसलं आहे. हिरवाईने नटलेले डोंगर इथलं वैशिष्ट्य म्हणता येईल. कोलकाता आणि गुवाहाटीहून इथे विमानाचं उड्डाण होतं; तसंच भूतान, थायलंड आणि नेपाळसारखे देशही यामुळे सिक्किमशी हवाई मार्गाने जोडले गेले आहेत. या विमानतळाची निर्मिती २०० एकर जमिनीवर करण्यात आली आहे. याचा रन वे १.७५ किलोमीटर लांब आहे. हे विमानतळ बांधण्यासाठी दहा वर्षांचा काळ लागला तर ६२० कोटी रूपये खर्च झाले. या विमानतळामुळे सिक्किमला येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. चीनी सीमेपासून अवघ्या काही किलोमीटर अंतरावर असल्याने इथे चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

## बर्फ वितळल्याने नद्या संकटात

**पृ**थ्वीवरच्या 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे हिमनद्या आणि बर्फाचे थर वितळत आहेत. त्यामुळे भारतासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या गंगा, ब्रह्मपुत्रा, सिंधू नद्या संकटात आल्या आहेत. हिमालयातील भौगोलिक हालचालींचा मोठा फटका भारतातील या प्रमुख नद्यांना बसणार आहे. भारतीय अंतराळ संस्था अर्थात 'इस्रो'ने याबाबत धोक्याचा इशारा दिला आहे. हिमालायातील हिमनद्या वेगाने वितळू लागल्याने धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे. हिमालयातील पर्वत रांगा या जगाचा तिसरा ध्रुव म्हणून ओळखल्या जातात. हिमालायातील हिमनद्या वेगाने वितळू लागल्याने तलावांची संख्या आणि त्यातील पाण्याची पातळी धोकादायक स्तरापर्यंत वाढू लागली आहे. अनेक तलावांतील पाण्याने धोक्याची पातळी ओलांडल्याने पुराचा धोका निर्माण झाला आहे. नेपाळ, चीन, आणि भारतातील काही भागांना या पुराचा तडाखा बसेल असा इशारा संशोधकांनी आधीच दिला आहे. हिमनद्या आणि बर्फ हे भारतातील नद्यांचे उगमस्थान आहेत; पण बर्फ वितळू लागल्याने हिमतलाव धोकादायक ठरू शकतात. हिमतलावांमुळे 'ग्लेशियल लेक आऊटबर्स्ट फ्लडस्'चा धोका निर्माण होत आहे. मध्यंतरी केदारनाथ, चमोली आणि सिक्कीममध्ये हिमस्खलन झाले. त्यामुळे सखल भागात राहणाऱ्या लोकांना पूर आणि भूस्खलनाचा धोका आहे. हिमालयातील हिमतलावांचा आकार सातत्याने वाढत आहे. हा भारतासाठी धोक्याचा इशारा मानला जात आहे. १९८४ ते मागील वर्षापर्यंतची आकडेवारीवर नजर टाकली असता हिमालयात २,४३१ तलाव आहेत. ज्यांचा आकार १० हेक्टरपेक्षा मोठा आहे. १९८४ पासून आत्तापर्यंत त्यातील ६७६ तलावांचे क्षेत्रफळ वाढले आहे. त्यापैकी १३० भारतात आहेत. सिंधू नदीवर ६५, गंगा नदीवर सात आणि ब्रह्मपुत्रेवर ५८ नव्या हिमनद्या तयार झाल्या आहेत. हिमाचल, उत्तराखंडमध्ये हिमकडा कोसळण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. 'इस्त्रो' उपग्रहांद्वारे हिमालयातील हिमतलावांवर लक्ष ठेवून आहे, जेणेकरून धोकादायक हिमतलाव फुटण्यापूर्वी लोकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करता येईल किंवा हे टाळण्यासाठी काही उपाय शोधता येतील. भारतामध्ये हिमालयातील हिमसरोवरांचा तीन ते चार दशकांचा डेटा उपलब्ध आहे. या उपलब्ध डेटाच्या निरीक्षणाचीही मोठी मदत होत आहे.



## रंगीबेरंगी नदी

**आ**काशात इंद्रधनुष्याचे सुंदर रंग दिसतात. सरडा परिस्थितीनुसार रंग बदलतो. निसर्गात असे बरेच चमत्कार पहायला मिळतात. आजवर आपण विविध नद्यांबद्दल ऐकलं आहे. काही नद्या लुप्त झाल्या आहेत. तर काही अचानक प्रगट झाल्या आहेत. काही नद्यांनी आपले मार्गही बदलले आहेत. पण शेजारच्या फोटोत दिसणारी नदी अनेक अर्थांनी वेगळी आहे. 'कॅनो क्रिस्टल्स' असं या नदीचं नाव आहे. कोलंबिया नावाच्या देशात ही नदी आहे. ही नदी ऋतूनुसार आपला रंग बदलते. हो, हे खरं आहे. ही नदी १०० किलोमीटर लांब आहे तर तिची रूंदी जवळपास २० मीटर आहे. या नदीला 'लिक्विड रेन्बो' असंही म्हटलं जातं. कधी या नदीच्या पाण्याचा रंग लाल असतो तर कधी तो पिवळा होऊन जातो. कधी तो हिरवा झालेला असतो. ही नदी रंग का बरं बदलत असेल? या प्रश्नाचं उत्तर एका रोपट्यात दडलं आहे. या नदीत 'मॅकारेनिया क्वॅवीगॅरा' नावाचं रोपटं आढळतं. या रोपट्यामुळेच नदीचा रंग बदलत राहतो. या रोपट्याला पुरेसं पाणी किंवा सूर्यप्रकाश मिळाला तर रंग गडद लाल किंवा सौम्य होतो. वर्षातला बराच काळ या नदीचा रंग



फिका किंवा गडद गुलाबी वा फिका किंवा गडद लाल असतो. पण काही वेळा पाण्याचा रंग पिवळा, हिरवा, नारिंगी किंवा अगदी निळाही होतो. जून ते नोव्हेंबर या काळात ही नदी रंग बदलते. निसर्गाचा हा अद्भुत कलाविष्कार पाहण्यासाठी इथे पर्यटकांची झुंबड उडालेली असते. पण निसर्गाच्या रक्षणासाठी काही नियमही घालण्यात आले आहेत. त्यानुसार एका दिवसात २०० पेक्षा जास्त लोकांना या प्रदेशात जाता येत नाही.

## उपचारासाठी सुट्टी न दिल्याने मृत्यू

**अ**नेकदा कर्मचारी आपल्या बॉसकडे गंभीर घरगुती कारणासाठी सुट्टी मागतात; पण काही कारणामुळे ती मिळत नाही. याचा काय परिणाम होऊ शकतो, हा अंदाज न लावलेला बरा. उत्तर प्रदेशच्या जालौन जिल्ह्यातील रामपुरा ठाण्याच्या प्रभारीने मनमानी केल्याने एका शिपायाला सुट्टी मिळाली नाही. गरोदर पत्नीवर उपचारासाठी हा शिपाई एक महिन्यापासून सुट्टी मागत होता; पण त्याला सुट्टी दिली नाही. दरम्यान, उपचार सुरू असताना पत्नी आणि नवजात बाळाचा जीव गेला. दोघांना मृतावस्थेत पाहून शिपाई बेशुद्ध पडला. शिपाई विकास निर्मल हे रामपुरा ठाण्यात कामाला आहेत. त्यांची पत्नी ज्योती ही मुंबईमध्ये रेल्वे प्रोटेक्शन फोर्समध्ये कॉन्स्टेबल होती. पत्नी गर्भवती असल्याने ती गावी घरच्यांसोबत राहत होती. तिच्या प्रसुतीची तारीख जवळ असल्यामुळे विकास गेल्या एक महिन्यांपासून सुट्टी मागत होता. त्याने चार वेळा लेखी अर्ज केला; पण सुट्टी देण्यात आली नाही. अचानक विकासच्या पत्नीची तब्येत बिघडल्यामुळे तिचा आणि नवजात शिशूचा मृत्यू झाला. घरातून ही बातमी कळताच विकास जीवाच्या आकांताने ओरडू लागला, रडू लागला. विकासबद्दल संवेदना दाखवण्यासाठी प्रभारी आपल्या गाडीने त्याला त्याच्या गावी घेऊन गेले; पण तोपर्यंत सर्व काही संपले होते. या प्रकरणात ठाणे प्रभारी दोषी आढळला असून त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.



पोलिस विभागाने विकासला एका महिन्याची सुट्टी दिली आहे; पण आता ही सुट्टी काय कामाची? असा प्रश्न विकास विचारत आहे. पत्नीचा नववा महिना सुरू होता, तेव्हापासून सुट्टी मागत होतो; पण दिली नाही, असे त्याने सांगितले. या घटनेनंतर विकासने 'सोशल मीडिया'त संवेदनशील पोस्ट लिहिली आहे. यामध्ये त्याने आपली पत्नी आणि बाळाची माफी मागितली आहे. तो स्वतःचे अश्रू आवरू शकला नाही. विकासबाबत खूप चुकीचे झाले, असे त्याच्या सहकर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

## काकडी तोडली, शिक्षा झाली



**का**कडीची चोरी करणं एका व्यक्तीला चांगलंच महागात पडलं आहे. काकडी चोरीच्या या आरोपीला ११ कोटी रूपयांचा दंड भरावा लागणार आहे. अमेरिकेतल्या एका न्यायालयाने ही शिक्षा सुनावली आहे. अर्थात ही साधीसुधी काकडी नव्हती तर समुद्री काकडी होती. एका कंपनीच्या मालकाने मोठ्या संख्येने या काकड्या काढल्या. सागरी संपत्ती गोळा करणारी त्याची कंपनी आहे. 'ओरिएंट सी फूड प्रोडक्शन्स' असं या कंपनीचं नाव आहे. या विचित्र घटनेला न्यायालयाने गांभीर्याने घेतलं. न्यायालयाने कंपनीला मालकाला तीन वर्षांची शिक्षा ठोठावली. इतकंच नाही तर भारतीय चलनाचा विचार करता अकरा कोटी रूपयांचा दंडही ठोठावला. अमेरिकेत समुद्रातून काकडी काढणं बेकायदेशीर नाही. पण ही कृती करण्याआधी संबंधित प्रशासनाकडून परवानगी घेणं गरजेचं असतं. हून नामकुंग असं या कंपनीच्या मालकाचं नाव आहे. गरजेपेक्षा २० टक्के अधिक काकडी काढल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. २०१४ ते २०१६ या काळात हूनने समुद्रातून १,१३,४०० काकड्या काढल्या होत्या. यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता होती. नंतरही त्याने हे काम सुरू ठेवलं. समुद्री काकड्यांमुळे पाण्यातल्या क्षारांची संख्या संतुलित राहते. जास्त प्रमाणात काकड्या काढल्याने पाण्याचं संतुलन बिघडून समुद्री जीवन धोक्यात येऊ शकतं. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयाचं सगळीकडून स्वागत होत आहे.

# एस.टी. बस प्रवासादरम्यान चोरीच्या घटना थांबता थांबेनात

## आठवडाभरात पुन्हा एका महिलेचे सव्वा लाखांचे दागिने गेले चोरीला

नगर - एस.टी. बस प्रवासा दरम्यान अनेक महिलांचे दागिने चोरीला गेलेले असताना आणखी एक अशीच घटना समोर आली आहे. पाथर्डी हून नगर मार्गे पुण्याकडे जाण्यासाठी एस टी बस मध्ये बसलेल्या महिलेचे पर्स मध्ये ठेवलेले सुमारे १ लाख २६ हजार ७८० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याबाबत अश्विनी दादासाहेब सुपेकर (रा. भालगाव, ता. पाथर्डी) यांनी मंगळवारी (दि.७) सायंकाळी पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी सुपेकर या पाथर्डी हून नगर मार्गे पुण्याकडे जाण्यासाठी रविवारी (दि.५) सकाळी १०.३० च्या सुमारास पाथर्डी बस स्थानकात आल्या होत्या. त्या पाथर्डी नगर पुणे या बस मध्ये बसल्या होत्या. त्यांनी त्यांच्या जवळील मोठ्या पर्स मध्ये एका छोटी पर्स ठेवली होती. त्यात सुमारे १ लाख २६ हजार ७८० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने ठेवलेले होते.

बस प्रवासा दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून पर्स मधील दागिने ठेवलेली छोटी पर्स चोरली. पुण्या मध्ये गेल्यावर ही चोरीची घटना त्यांच्या लक्षात आली त्यानंतर त्यांनी मंगळवारी सायंकाळी पुन्हा पाथर्डी मध्ये जावून पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

### ८ दिवसांत तिसरी चोरीची घटना

दरम्यान आठवडा भरापूर्वी २ मे रोजी नगरहून शेवगाव कडे जाण्यासाठी माळीवाडा बसस्थानकातून एस टी बस मध्ये बसलेल्या केडगाव मधील महिलेचे पर्स मध्ये ठेवलेले सुमारे ४ लाख ४ हजार रुपये किमतीचे ५ तोळे ६ ग्रॅम वजनाचे दागिने अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली होती. याबाबत स्मिता कल्याण पागिरे (रा. रेणुका नगर, केडगाव, मूळ रा. आंतरवाली, ता. शेवगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्यानंतर शुक्रवारी (दि.३) दुपारी माळीवाडा बस स्थानकावर एका सेवानिवृत्त शिक्षकाचा खिसा मारताना एका चोरट्या महिलेला नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याची घटना घडली आहे.

### प्रवासात महिलांनी दागिने सांभाळण्याची गरज

सध्या लग्न सराई सुरु असल्याने बाहेरगावी जाण्यासाठी महिला वर्ग एस टी बसला जास्त पसंती देत आहे. बस प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत शासनाने लागू केलेली असल्याने महिलांची नेहमीच एस टी बस प्रवासासाठी गर्दी होताना दिसत आहे. याच गर्दीचा फायदा घेत महिलांचे दागिने चोरणारे चोरटे सध्या मोठ्या प्रमाणावर सक्रीय झालेले आहेत. शहरासह जिल्ह्यात बस स्थानकावर तसेच बस प्रवासादरम्यान महिलांचे दागिने चोरीला जाण्याचे प्रमाण वाढलेले आहे. या चोरट्यांनी पोलिसांसमोर एकप्रकारे आव्हानच उभे केलेले आहे. त्यामुळे बस प्रवासात महिलांनी दागिने सांभाळण्याची गरज आहे.



डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ नगर शहरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आयोजित सभेनिमित्त माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी महारॅलीचे आयोजन करीत शक्तीप्रदर्शन केले. (छाया - लहू दळवी)

# विकासाच्या योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत घेऊन जायचे आहे

## माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांचे प्रतिपादन

नगर - शहर विकासासाठी डॉ. सुजय विखे पाटील यांना पुन्हा एकदा निवडून द्यायचे आहे, यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी नगर शहरात आल्यानंतर त्यांचे विचार सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान होणार असून सर्वसामान्य जनतेपर्यंत विकासाच्या योजना घेऊन जायचे आहे. यासाठी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यायचे आहे असे माजी महापौर बाबासाहेब वाकळे म्हणाले.

लोकसभा निवडणुकीचे वारे वाहत असताना नगर दक्षिण लोकसभा महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ नगर शहरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आयोजित सभेनिमित्त माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी महारॅलीचे आयोजन करीत शक्तीप्रदर्शन केले. यावेळी सावेडी गाव व परिसरातून सुमारे ५ हजार नागरिक वाजत गाजत मोठ्या उत्साहात सभेच्या ठिकाणी दाखल झाले. यावेळी अशोक वाकळे, किशोर वाकळे, पुष्कर कुलकर्णी, आदींसह नागरिक उपस्थित होते.

# 'ईव्हीएम' प्रकरणी नगरच्या लष्करी जवानाला अटक

## मशिन हॅक करण्यासाठी मागितले अडीच कोटी; विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी केली होती तक्रार

नगर - ईव्हीएम मशीनला विशिष्ट प्रकारची चिप बसवुन उमेदवारास जास्त मतदान करून देण्याच्या बहाण्याने अडीच कोटी रूपयांची मागणी करून फसवणूक करणाऱ्या मारुती नाथा ढाकणे (वय -४२, रा. काटेवाडी, पो. खरवंडी कासार, ता. पाथर्डी) याला छत्रपती संभाजीनगर मध्ये पकडण्यात आले आहे. विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी याबाबत तक्रार केली होती.

मुळचा नगर जिल्ह्यातील रहिवासी असलेला ढाकणे हा लष्करात हवालदार पदावर कार्यरत असून तो उदमपुर, जम्मु येथे नियुक्तीस आहे. यासंदर्भात विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मंगळवारी (दि.७)पोलीस आयुक्त यांना दिलेल्या लेखी तक्रारीनुसार, त्यांचे मोबाईलवर मारुती ढाकणे असे नांव सांगणाऱ्या इसमाने मतदान केंद्रात निवडणुकीत वापरण्यात येणाऱ्या ई व्ही एम मशीनला माझ्याकडील विशिष्ट प्रकारची चीप बसवुन तुमच्या उमेदवारास जास्तीत जास्त मतदान करून देतो असा बहाणा करून त्या मोबदल्यात मला अडीच कोटी रूपये द्यावे लागतील, असे सांगितले. या प्रकरणाचे गांभीय लक्षात घेवुन पोलीस आयुक्त मनोज लोहिया यांनी तात्काळ आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संभाजी पवार यांच्या नेतृत्वात विशेष पथक नेमून हे पथक अंबादास दानवे यांचे बंधू राजेंद्र दानवे यांचे सोबत रवाना केले.

दुपारी चार वाजेच्या सुमारास सदर इसम मारुती ढाकणे यांने राजेंद्र दानवे यांना छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बस स्थानक समोरील हॉटेल न्यू मॉडर्न टि हाऊस स्विट अॅण्ड स्नॅक्स येथे बोलविले होते. या ठिकाणी राजेंद्र दानवे, साध्या गणवेषातील पोलीस पथक व पंच असे सापळा लावुन थांबलेले असतांना मारुती ढाकणे हा त्या ठिकाणी आला. त्याने राजेंद्र दानवे यांना सांगितले कि, माझ्याकडे एक विशिष्ट प्रकारची चीप असुन दि. १३ मे रोजी मतदानाच्या दिवशी विशिष्ट प्रकारची चिप मतदान केंद्रामध्ये जावुन ईव्हीएम मशीनला बसविण्याची व्यवस्था करतो.

त्यामुळे फक्त तुमच्याच उमेदवारास जास्तीत जास्त मतदान मिळेल,असे सांगुन मोबाईलवर संभाषणात ठरल्याप्रमाणे अडीच कोटी रूपयांपैकी तडजोडीअंती दीड कोटी रुपयांची मागणी करून टोकन रक्कम म्हणुन एक लाख रूपयांची मागणी केली. त्याप्रमाणे राजेंद्र दानवे यांच्याकडुन त्याने एक लाख रुपये स्वीकारतांना पंचासमक्ष सापळा लावुन बसलेल्या साध्या वेशातील पोलीस पथकाने रंगेहाथ पकडले. त्यास ताब्यात घेण्यात आले असून पुढील कायदेशीर कार्यवाहीची प्रक्रिया सुरु आहे.





दिल्लीगेट वेशीजवळ पोलिसांच्या एका स्कॉर्पिओने धडक दिलेली दुचाकी, तर संतप्त जमावाने अडवून धरलेली व काचा फोडलेली स्कॉर्पिओ छायाचित्रात दिसत आहे. (छाया- बबलू शेख)

# पोलिसांच्या स्कॉर्पिओची दुचाकीला धडक; २ जण जखमी; नागरिकांनी फोडल्या काचा

नगर - शहरातील दिल्लीगेट वेशीजवळ मंगळवारी (दि.७) रात्री सव्वादहा वाजण्याच्या सुमारास पोलिसांच्या एका स्कॉर्पिओने दुचाकी वरील दोघांना जोराची धडक दिली. यात दोघेही जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. दरम्यान घटनेनंतर संतप्त नागरिकांनी एकत्र येऊन पोलिसांची स्कॉर्पिओ अडवून धरली. जमाव आक्रमक झाल्यानंतर गाडीची तोडफोड करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

शहरात पंतप्रधान मोदींच्या सभेसाठी बंदोबस्ताला जिल्हाभरातून पोलीस अधिकारी, कर्मचारी दाखल झाले होते. मोठ्या प्रमाणात बाहेरून वाहने नगर शहरात आलेली होती. रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास पोलिसांची एक स्कॉर्पिओ (एमएच ४३ जी २७०) सिद्धीबागेकडून दिल्लीगेटच्या दिशेने भरधाव वेगाने जात असताना समोरून येणाऱ्या दुचाकीला (एमएच १७ झेड ४३८३) त्यांनी जोराची धडक दिली. या दुचाकीवरील दोघे युवक गंभीर जखमी झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी त्यांना तात्काळ उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलवले. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. मोठा जमाव जमल्याने त्यांनी पोलिसांची स्कॉर्पिओ अडवून धरली. जमाव आक्रमक झाल्याने गाडीची तोडफोडही करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच कोतवाली व तोफखाना पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. बुधवारी (दि.८) दुपारपर्यंत याबाबत कुठलाही गुन्हा दाखल झालेला नव्हता असे पोलिसांनी सांगितले.





मोदींच्या सभेत केजरीवाल यांच्या अटकेसंदर्भातील फलक झळकवताना आपचा कार्यकर्ता तर पोलिसांनी ताब्यात घेतलेले कार्यकर्ते. (छाया - बबलू शेख)

# थेट मोदींच्या सभेत झळकावले केजरीवाल यांच्या अटकेचे फलक

## 'आप'च्या पदाधिकाऱ्यांना पोलीसांनी घेतले ताब्यात

नगर - शहरात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मंगळवारी (दि. ७ मे) झालेल्या सभेत आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना झालेल्या अटकेच्या निषेधार्थ जेल का जवाब वोट से ही पत्रके झळकावले.

पंतप्रधान मोदींचे भाषण सुरु असताना ही पत्रके भर सभेत स्टेजच्या समोर आपचे जिल्हाध्यक्ष राजू आघाव यांनी झळकावले. यावेळी पोलीसांनी आघाव व शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ यांना ताब्यात घेऊन तोफखाना पोलीस स्टेशन येथे बसवून ठेवले. यावेळी पोलीस स्टेशनला दिलीप घुले, गणेश मारवडे, राजेंद्र कर्डिले आदी कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. सभा संपल्यावर आपच्या कार्यकर्त्यांना सोडण्यात आले.

# मिशन अमृत - ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदानासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयार्फत मतदार जागृती

नगर - अहमदनगर-शिर्डी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सिद्धाराम सालीमठ, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मिशन अमृत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक मतदान जिल्ह्यात घडवून आणण्यासाठी अहमदनगर जिल्हा स्वीप समितीच्या माध्यमातून विविध मतदार जनजागृतीचे उपक्रम वेग घेत आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय अहमदनगर यांच्या मार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाचे वाचक, ग्रंथपाल, कर्मचारी, वाचन चळवळीशी संबंधित विविध व्यक्ती, संस्था, ग्रंथ भांडार इ. घटक यांच्या माध्यमातून ७ ते १२ मे या कालावधीमध्ये जिल्ह्यातील १४ तालुक्यामध्ये व अहमदनगर शहरामध्ये जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयामार्फत लोकशाहीचे पुस्तक हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यामध्ये मतदान शपथ व संकल्पपत्र भरून घेणे, डेमोक्रसी ऑन व्हील-सायकल रॅली, माय एपिक-माय बाईक-बाईक रॅली (इपिक-राष्ट्रीय मतदार ओळखपत्र/ वोटर कार्ड) लोकशाही दौड वाचक आयकॉन/विविध कवी, लेखक, साहित्यिक शोभायात्रा / प्रभात फेरी, सर्व ग्रंथालये पदाधिकारी-कार्यकारीणी व प्रतिष्ठित अराजकीय व्यक्ती १३ मे रोजी १०० टक्के मतदान करणार असा संदेश देणारे व्हिडिओ/ग्राफिक इमेजेस/ रील सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर करणार असून म तदार मार्गदर्शिका वाटप करणार आहेत. या उपक्रमात अहमदनगर जिल्ह्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी सहभाग घेवून मतदार जागृती करावी, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी तथा प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.



अहमदनगर जिल्हा श्रमिक असंघटीत कष्टकरी कामगार संघटनेतर्फे नागरिकांनी मतदान करावे यासाठी जनजागृती अभियान राबविताना विलास कराळे पाटील, अशोक सब्बन, सुधीर भद्रे, जुनेद बागवान, सोपान दळवी, वसंत मोकाटे.

# अहमदनगर जिल्हा श्रमिक असंघटित कष्टकरी कामगार संघटनेची नागरिकांसाठी मतदारजागृती

नगर - अहमदनगर जिल्हा श्रमिक असंघटित कष्टकरी कामगार संघटनेच्या वतीने लोकसभा मतदान २०२४ च्या नागरिकांना मतदार जागृती अभियान राबवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मतदार जागृती रॅली काढून चौक सभा घेण्यात आल्या यावेळी अहमदनगर जिल्हा श्रमिक असंघटित कष्टकरी कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विलास कराळे पाटील समवेत सामाजिक कार्यकर्ते अशोक सबंन, सुधीर भद्रे, जुनेद बागवान, सोपान दळवी, वसंतराव मोकाटे आदी उपस्थित होते.

अहमदनगर जिल्हा श्रमिक असंघटित कष्टकरी कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विलास कराळे पाटील म्हणाले की, नागरिकांनी स्वतःहून मतदान करण्याची गरज आहे. या विचाराने सशक्त भारत घडणार असल्याचे सांगितले व लोकशाही मजबूत होणार आहे. आपल्या एका मताने चांगला व सक्षम उमेदवार निवडून आल्यास त्या लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून नागरिकांचे प्रश्न सुटतील. मतदान समाजाचे भविष्य घडविण्यासाठी उपयुक्त ठरत असून, मतदान करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

संघटनेच्या वतीने घेतलेल्या मतदार जागृती अभियानात चौका चौकात सभा घेऊन नागरिकांना मतदान करण्याचे आव्हान करण्यात आले व मतदानाविषयी माहिती देण्यात आली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# सुजय विखे व सदाशिव लोखंडे या अनुभवी खासदारांचा विजय निश्चित

## केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड, महेंद्र गंधे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

नगर - पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अबकी बार चारसो पार ही घोषणा प्रत्यक्षात येणार आहे. नगर दक्षिण व उत्तर या दोन्ही मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी अतिशय पोषक वातावरण आहे. खा.विखे व खा.लोखंडे हे दोघेही अनुभवी असल्याने त्यांचा विजय निश्चित आहे, असा विश्वास यावेळी केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड यावेळी व्यक्त केला.

महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे व सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारार्थ नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी नगरमध्ये आलेल्या केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड, राज्याचे कृषीमंत्री दादा भुसे यांनी भाजपाचे नगर विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे यांच्या निवासस्थानी मंगळवारी सदिच्छा भेट दिली.



केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड, राज्याचे कृषीमंत्री दादा भुसे यांनी भाजपाचे नगर विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट असता त्यांचा सत्कार करताना मल्हार गंधे व अॅड. ऋग्वेद गंधे. यावेळी महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे, तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे.

त्यांच्या समवेत सदाशिव लोखंडे, भाजपा जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव लंघे, तिरुपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ बोरा, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे आदी उपस्थित होते. यावेळी यावेळी बीजेपी विंग्जचे प्रदेश संयोजक मल्हार गंधे व अॅड. ऋग्वेद गंधे यांनी मंत्री कराड, मंत्री भुसे आदींचे स्वागत व सत्कार केला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नगर दक्षिण मधून खा.सुजय विखे यांचे पारडे जड आहे. नरेंद्र मोदी यांची नगरमध्ये झालेल्या सभेने खा.विखेंचे मताधिक्यात लाखोंच्या मतांनी वाढ होणार असल्याचा विश्वास महेंद्र गंधे यांनी यावेळी व्यक्त केला.

# विखेंच्या प्रचारार्थ शिक्षक व पदवीधरांचा ९ मे रोजी नगरमध्ये जिल्हास्तरीय मेळावा

नगर - नगर दक्षिण मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांच्या प्रचारार्थ भारतीय जनता पार्टीच्या पदवीधर प्रकोष्ठ च्या वतीने शिक्षक व पदवीधरांच्या जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन नगरमध्ये करण्यात आले आहे. सावेडी येथील कोहिनूर मंगल कार्यलयात ९ मे रोजी सायंकाळी ५: ३० वाजता हा मेळावा होणार आहे, अशी माहिती नाशिक विभागीय पदवीधर प्रकोष्ठचे विभागीय संयोजक दामोदर बठेजा यांनी दिली.

या मेळाव्यास सुजय विखे, पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते, शिक्षक आघाडीचे प्रदेश संयोजक डॉ.प्रशम कोल्हे, शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल लंघे, विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे, ज्येष्ठनेते प्रा.भानुदास बेरड, मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव सुनील पंडित उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्यास पदवीधरांनी व शिक्षकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रकोष्ठचे जिल्हा संयोजक कुशाहरी भांड, शिक्षक आघाडीचे समन्वयक हरिभाऊ चकोर, सागर भांड, अरविंद आचार्य, पोपट लोंढे व रघुनाथ ठोंबरे आदींनी केले आहे.

